वर्ष: 7 अंक: 05

1-15 सप्टेंबर, 2026 (विनामूल्य)

# न्यू इंडिया समाचार



80वा स्वातंत्र्यदिन सोहळा

# देशाच्या अविरत प्रवासाचा जयघोष...

स्वातंत्र्याची 100 वर्षे पूर्ण करण्याचा संकल्प साकार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या 13व्या भाषणात देशासमोर विकासाच्या सात नव्या शक्तींचा आराखडा मांडला. सोबतच, सेमीकंडक्टरपासून ते संरक्षण क्रांतीपर्यंत, सर्वच आघाड्यांवर स्वावलंबी (आत्मनिर्भर) भारताची सोनेरी झलक रेखाटली...

आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia

# चला... सगळे मिळून
# विकसित भारत घडवूया!




**लाल किल्ल्यावरचा अविस्मरणीय स्वातंत्र्यदिन! हा दिवस आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महापुरुषांच्या शौर्याची आणि बलिदानाची आठवण करून देतो. तिरंगा आपल्याला प्रत्येक आव्हानावर मात करण्यासाठी, एकतेचे बंध अधिक दृढ करण्यासाठी आणि राष्ट्राप्रती स्वतःला समर्पित करण्यासाठी प्रेरणा देतो. काळ आपला आहे, संधी आपली आहे, संकल्प आपला आहे—चला, सगळे मिळून विकसित भारत घडवूया...**

लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण
ऐकण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.



न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 7, अंक: 05 । 1-15 सप्टेंबर, 2026

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा
प्रधान महासंचालक, पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादक
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

वरिष्ठ रचनाकार
फूलचंद तिवारी

रचनाकार
अभय गुप्ता
सत्यम सिंह



**13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी येथे क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचार बद्दल नियमित अपडेटसाठी फॉलो करा:-@NISPIBIndia

# आतील पानांवर...

80 वा स्वातंत्र्यदिन सोहळा
मुखपृष्ठ कथा

## 2047चा संकल्प सप्त धारा चे सामर्थ्य

गेल्या 12 वर्षांत 'राष्ट्र प्रथम' या मंत्रासह भारताने लिहिलेला विकासाचा नवा अध्याय, 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या लक्ष्याचा आधारस्तंभ बनला आहे. या पार्श्वभूमीवर, या 15 ऑगस्टला लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधान मोदी यांनी विकासाच्या नव्या 'सप्तधारे' (सत शक्ती) चे आवाहन केले. यासोबतच, त्यांचे 13वे भाषण राष्ट्राच्या अखंड प्रवासाचा जयघोष ठरले... |10-29



भीषण फाळणीचा स्मृती दिन

### भारताची एकता, अखंडता आणि शांतता राखण्याचा दृढ संकल्प

देशाच्या फाळणीचे दुःख आणि लोकांचा संघर्ष आणि बलिदानाच्या स्मृतिप्रित्यर्थ म्हणून 14 ऑगस्ट रोजी पाळल्या जाणाऱ्या 'विभाजन विभिषिका स्मृती दिना' (भीषण फाळणीचा स्मृती दिन) मुळे मानवी संवेदना अधिक दृढ होतात.... |30-31





### युपीआय सेवा यापुढेही निःशुल्क राहील...

सामान्य ग्राहकांसाठी आणि व्यक्ती-ते-व्यक्ती (P2P) व्यवहारांसाठी यूपीआय सेवा पूर्णपणे विनामूल्य सुरू राहील. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केले की डिजिटल व्यवहारांवरील व्यापारी व्यवहार शुल्क दर (मर्चंट डिस्काउंट रेट-एमडीआर) व्यापाऱ्यांवर लागू होतो, ग्राहकांवर नाही |38



वृत्तसार |4-5

व्यक्तिमत्त्व : आशा भोसले
ज्यांनी आपल्या आवाजाच्या जोरावर कोट्यवधी हृदयांवर राज्य केले |6

अनुकूल वातावरणातून औद्योगिक क्रांतीचे नवे उड्डाण
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंध्र प्रदेशला दिली विकासाची भेट |32-34

गुवाहाटी-तेजपूर महामार्ग आणि गोबरधन योजनेला मंजुरी
केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय |35

'युवा' हाच प्रत्येक निर्णयाचा आधार
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयआयटी दिल्लीच्या पदवीदान समारंभाला केले संबोधित |36-37

विकसित भारतासाठी उत्तम शारीरिक आणि मानसिक आरोग्य आवश्यक
'नशामुक्त युवा विकसित भारत संकल्प अभियान' या मोहिमेचा शुभारंभ |39

भावी पिढीला प्रेरणेचा मंत्र...
राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्यांशी पंतप्रधान मोदी यांचा संवाद |40-41

भारतीय लोकशाही आणि समाजासाठी वारसा
माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन |42

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा राष्ट्राला संदेश



### विकसित भारत... वास्तविक ध्येय विकास आणि कल्याण

देशाच्या 80व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला दिलेल्या संदेशात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासीयांना संविधानाच्या मूल्यांचे आणि मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्याचे केले आवाहन... |7-9

प्रकाशक : कंचन प्रसाद, महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार विभाग) पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : खोली क्रमांक -1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. ईमेल - response-nis@pib.gov.in, आर. एन. आय. क्रमांक DELHIN/2020/78812

# संपादकाच्या लेखणीतून...

## लाल किल्ल्यावरून पंतप्रधान मोदी यांचे आवाहन

### सप्तधारा आणि विकसित भारताचा संकल्प; तरुणांना मोफत प्रशिक्षणाची भेट

वंदे मातरम्।

लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 13वे भाषण एका ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पहिल्यांदाच लाल किल्ल्यावर 'वंदे मातरम्'चा ध्वनी निनाद गुंजला. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधानांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 2047 पर्यंत भारत विकसित राष्ट्र नक्कीच बनेल. या दिशेने देशाने उत्पादन, डिजिटल व्यवहार आणि आधुनिक पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. हायड्रोजनवर धावणाऱ्या पहिल्या रेल्वेगाडीची सुरुवात आणि अणुऊर्जेच्या क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने उचललेली पावले ही या प्रगतीची ठळक उदाहरणे आहेत.

या भाषणाचा मध्यवर्ती संदेश 'सप्तधारे'चे आवाहन हा होता, ज्यामध्ये राष्ट्र उभारणीच्या सात शक्ती अधोरेखित करण्यात आल्या—उत्पादनाचे सामर्थ्य, शेती आणि अन्न उत्पादन, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, गती शक्ती, संरक्षण शक्ती, हरित आणि नील अर्थव्यवस्था आणि भारताची सुप्त शक्ती (सॉफ्ट पॉवर). या सातही शक्ती मिळून विकसित भारताच्या संकल्पाला गती देतील.

तरुणांना या प्रवासाचे सारथी मानत पंतप्रधानांनी येत्या वर्षात 1 कोटी तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कौशल्यांमध्ये प्रशिक्षित करण्याचे ध्येय ठेवले आहे. यासोबतच विविध स्पर्धा परीक्षांसाठी मोफत ऑनलाइन प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे आवाहनही केले. 2030 या वर्षात राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद भूषवायला मिळणे हे भारताचे वाढते क्रीडा सामर्थ्य आणि तरुणांच्या क्षमतेचे प्रतीक आहे.

नशामुक्त भारतासाठी 100 आठवड्यांची विशेष मोहीम, नक्षलवादाचा वैचारिक आधार मुळापासून उखडून टाकण्याची रणनीती आणि नागरी संरक्षण (सिव्हिल डिफेन्स) यंत्रणेचे सशक्त जाळे तयार करण्याची संकल्पना— या सर्व गोष्टी एका सुरक्षित आणि शिस्तबद्ध समाजाचा पाया रचतील. महिला सक्षमीकरणाप्रती सरकारची कटिबद्धता दर्शवत 'नारी शक्ती वंदन अधिनियम' लवकरात लवकर लागू करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. जनगणनेत अचूक माहिती भरण्याचे आग्रही आवाहन आणि 'पंचप्रणां'चा (पाच निर्धार) पुनरुच्चार यांनी नागरिकांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. एकंदरीत, हे भाषण संकल्प, समर्पण आणि सामूहिक प्रयत्नांचे एक आवाहन आहे, आणि हीच आमच्या यावेळच्या अंकाची मुखपृष्ठ कथा बनली आहे.

याशिवाय, व्यक्तिमत्त्व मालिकेत आपल्या आवाजाच्या जोरावर कोट्यवधी हृदयांवर राज्य करणाऱ्या आशा भोसले, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंधरवड्यातील कार्यक्रमांचा, अंकात समावेश करण्यात आला आहे.

तसेच,या पाक्षिकाच्या मुखपृष्ठाच्या आतील भागावर, 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याची तटबंदी आणि समोर बसलेले विकसित भारताचे सारथी यांची दृश्ये आणि मलपृष्ठाच्या बाह्य भागावर युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेल्या 'सारनाथचे प्राचीन बौद्ध स्थळ' यावर विशेष मजकूर समाविष्ट केला आहे.

आपले अभिप्राय आणि सूचना आम्हाला नक्की पाठवत राहा.

(धीरेन्द्र ओझा)

मराठी, हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचण्यासाठी आणि उतरवून घेण्यासाठी येथे कळ दाबा:
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# तुमचे मत...







## ज्ञानवर्धक, विश्वासार्ह आणि उपयुक्त पाक्षिक

'न्यू इंडिया समाचार' हे एक ज्ञानवर्धक, विश्वासार्ह आणि उपयुक्त पाक्षिक आहे. या पाक्षिका मुळे मला केंद्रीय लोकसेवा आयोग (युपीएससी) परीक्षेच्या तयारीत खूप मदत होत आहे. विशेषतः विविध सरकारी योजनांबद्दल एक संतुलित दृष्टिकोन आणि समज विकसित करण्यासाठीही खूप उपयुक्त ठरत आहे. माझ्याकडून 'न्यू इंडिया समाचार'च्या संपूर्ण चमुला मनापासून धन्यवाद.


**प्रिन्स कुमार सिंह**

ps0488034@gmail.com


## परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वस्तुनिष्ठ माहितीचा स्रोत

न्यू इंडिया समाचार या पाक्षिकात प्रसिद्ध होणारे लेख सोप्या भाषेत उपयुक्त माहिती देतात. हे पाक्षिक भारताच्या विकासाचे विविध पैलू समजून घेण्यास मदत करते. हे वाचायला सोपे आणि माहितीपूर्ण आहे. याव्यतिरिक्त, यूपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे पाक्षिक अधिकृत माहितीचा एक मौल्यवान स्रोत आहे. एकूणच, हे पाक्षिक  वाचकांना देशाच्या प्रगतीची माहिती तर देतेच,सोबत प्रत्येक नागरिकाला विकसित भारत घडवण्यात योगदान देण्यासाठी प्रेरितही करते.


ashishprabhatmishra@gmail.com


## छायाचित्रे आणि तथ्यांवर आधारित मांडणीमुळे वाचायला सोपे

मी न्यू इंडिया समाचारचा 1-15 ऑगस्ट 2026 चा अंक वाचला. तो खूप ज्ञानवर्धक वाटला, विशेषतः त्यातील मुखपृष्ठ कथा! हा लेख माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि उत्तम प्रकारे मांडलेला आहे. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्यसेवा, कृषी आणि समाजकल्याण यांसारख्या क्षेत्रांतील भारताचा विकासप्रवास यात प्रभावीपणे दाखवण्यात आला आहे. तसेच हा लेख 'विकसित भारता'च्या दृष्टिकोनालाही बळ देतो. छायाचित्रे आणि वस्तुनिष्ठ माहितीवर आधारित मांडणीमुळे लेख रंजक आणि समजायला सोपा बनतो.


**वडावल्ली श्रीधर**

vsdhar121@gmail.com


## नवीन उपक्रम, सार्वजनिक धोरणे आणि विद्यमान घडामोडीं बाबतची उत्तम माहिती

मी न्यू इंडिया समाचार पाक्षिकाचा नियमित वाचक आहे. मला हे पाक्षिक अत्यंत माहितीपूर्ण वाटते. यामध्ये विशेषतः भारत सरकारचे उपक्रम, सार्वजनिक धोरणे आणि विद्यमान घडामोडी समजून घेण्यासाठी उत्तम माहिती असते.


**हर्षद मकवाना**

harshmak161184@gmail.com


## ज्ञान आणि कौशल्य विकासात मिळते मदत

मी नियमितपणे न्यू इंडिया समाचार हे पाक्षिक वाचतो. हे खूप ज्ञानवर्धक आहे आणि सरकारच्या विकासविषयक उपक्रमांची माहिती देते. यामुळे माझ्या वैयक्तिक विकासात, ज्ञान आणि कौशल्य वाढीस मदत होते. मला हे पाक्षिक वाचायला आणि त्यातून शिकायला खूप आवडते.


**भास्कर सिंग महर**

bhaskarmahar65@gmail.com



पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ताः खोली क्रमांक 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003

ईमेल- response-nis@pib.gov.in

## वृत्त सार




### सरकारी कार्यालयात माराव्या लागणाऱ्या चकरा आणि लांब रांगेतून मुक्ती

# उमंग ॲपवर 2,575 सेवा, डिजिलॉकरचे 72 कोटी वापरकर्ते

भारत सरकारच्या डिजिटल इंडिया आणि डिजिटल सेवांचा वापर सर्वसामान्य नागरिकां कडून होत असल्याचा परिणाम म्हणजे, आता त्यांना सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत नाहीत. घरबसल्या विविध डिजिटल सेवा सहज उपलब्ध होत आहेत. आधार, उमंग, डिजिलॉकर, सामायिक सेवा केंद्र आणि ई-संजीवनी यांसारख्या सेवा नागरिक सहजपणे वापरत आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानुसार देशात इंटरनेट ग्राहकांची संख्या 109 कोटींच्या वर पोहोचली आहे. तर देशात आतापर्यंत 144 कोटींपेक्षा जास्त आधार क्रमांक जारी करण्यात आले आहेत. डिजिलॉकर मंचावर 71.66 कोटींपेक्षा जास्त नोंदणीकृत वापरकर्ते आहेत. त्यावर 2,822 नोंदणीकृत संस्थांनी जारी केलेली 963.03 कोटींपेक्षा जास्त कागदपत्रे उपलब्ध आहेत. युनिफाइड मोबाईल ॲप्लिकेशन फॉर न्यू एज गव्हर्नन्स (उमंग) ॲपद्वारे नागरिकांना 2,575 सरकारी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

### पीएम सूर्य घर मोफत वीज योजना

# 51 लाखांपेक्षा जास्त कुटुंबांना लाभ; 28.4 लाख कृषी पंपांचे सौरीकरण

नवीकरणीय (अपारंपरिक) ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने अनेक योजना चालवल्या आहेत. याच मालिकेत फेब्रुवारी, 2024 मध्ये सुरू झालेल्या पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेचा 10 ऑगस्टपर्यंत 51.27 लाखांपेक्षा जास्त कुटुंबांनी लाभ घेतला आहे. या योजनेअंतर्गत 41.76 लाख छपरावरील सौर तबकड्या बसवण्यात आल्या आहेत. या कुटुंबांना 28 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम अनुदान म्हणून दिली गेली आहे. या योजनेचे लक्ष्य एक कोटी घरांमध्ये छपरावरील सौर तबकड्यांची स्थापना करणे आहे. त्यासाठी 75 हजार कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद ठेवण्यात आली आहे. देशात सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी चालवल्या जाणाऱ्या पीएम कुसुम योजनेअंतर्गत 31 जुलै, 2026 पर्यंत 28.4 लाख सिंचन पंपांचे सौरीकरण (सौर ऊर्जेवरील परिचालन) पूर्ण करण्यात आले आहे.



# भारताचे 101 वे रामसर स्थळ

### अरुणाचल प्रदेशचे 'ग्लाव सरोवर'

पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि शाश्वत विकासाप्रती केंद्र सरकारच्या कटिबद्धतेचे फलित म्हणून अरुणाचल प्रदेशातील ग्लाव सरोवर हे त्या राज्यातील पहिले आणि देशातील 101 वे रामसर स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. 2014 मध्ये देशात केवळ 26 रामसर स्थळे होती. अवघ्या 12 वर्षांत ही संख्या वाढून 101 झाली आहे.



कमलांग व्याघ्र प्रकल्प आणि वन्यजीव अभयारण्याअंतर्गत स्थित ग्लाव सरोवर पूर्व हिमालयातील एक निर्मळ गोड्या पाण्याचे सरोवर आहे आणि जैव विविधतेचे एक प्रमुख केंद्र आहे. हे सरोवर वर्षभर वाहणाऱ्या डोंगरातील झऱ्यांच्या पाण्याने भरते आणि चारही बाजूंनी घनदाट हिरवाईने वेढलेले आहे. या परिसरात 150 हून अधिक प्रकारची झाडे आणि ऑर्किडच्या 49 प्रजाती आढळतात.



## सायबर गुन्हेगारीवर वेसण

# सरकारने गोठवली 3,700 हून अधिक दिशाभूल करणारी आणि बनावट ॲप्स

भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने (I4C) नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल (**cybercrime.gov.in**) सुरू केले आहे. यासोबतच आयटी ॲक्ट 2000 या माहिती तंत्रज्ञान कायद्या अंतर्गत कारवाई करत कर्जपुरवठ्याच्या बनावट ॲप्ससह एकूण 3,718 फसवणूक करणारी मोबाईल ॲप्स गोठवण्यात आली आहेत.

लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक फसवणुकीची त्वरित तक्रार नोंदवण्यासाठी आणि फसवणुकीची रक्कम तात्काळ गोठवण्यासाठी 2021 मध्ये 'नागरिक वित्तीय सायबर फसवणूक नोंदणी आणि व्यवस्थापन प्रणाली' सुरू करण्यात आली. या प्रणालीद्वारे 30 जून 2026 पर्यंत दाखल झालेल्या 32.80 लाखांहून अधिक तक्रारींच्या प्रकरणांमध्ये, 11,158 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम लुबाडली जाण्यापासून वाचवण्यात आली आहे. तसेच 30 जून 2026 पर्यंत सरकारने 15.75 लाखांहून अधिक सिम कार्ड आणि 5.77 लाख आंतरराष्ट्रीय मोबाईल उपकरण ओळख क्रमांक (आयएमईआय क्रमांक) गोठवले आहेत.







## जीआय टॅग मिळालेला मिथिला ऑस्ट्रेलियात पोहोचला

बिहारच्या दरभंगा जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून थेट खरेदी केलेल्या 18 मेट्रिक टन जीआय-टॅग प्राप्त मिथिला मखाण्याची पहिली व्यावसायिक खेप सागरी मार्गाने ऑस्ट्रेलियाला पाठवण्यात आली आहे. 'अपेडा' (**APEDA**- ॲग्रिकल्चरल अँड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्ट्स एक्सपोर्ट डेव्हलपमेंट अथॉरिटी) या कृषी आणि प्रक्रियायुक्त अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाच्या सहकार्याने झालेल्या या निर्यातीमुळे शेतकऱ्यांना बाजारभावापेक्षा सुमारे 18 % जास्त नफा मिळाला आहे. दरभंगा जिल्ह्यातील मखाणा उत्पादकांकडून पाठवण्यात आलेल्या या खेपेमुळे बिहारमधील या प्रमुख जीआय उत्पादनाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील ओळख अधिक मजबूत होईल आणि शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या चांगल्या संधी उपलब्ध होतील.

भारताच्या मखाणा उत्पादनात बिहारचा वाटा सुमारे 85 % आहे. हे क्षेत्र अधिक बळकट करण्यासाठी जुलै 2025 पासून मखाण्यासाठी स्वतंत्र वस्तू वर्गीकरण क्रमांक (एचएस कोड) लागू करण्यात आला. 2025-26 या आर्थिक वर्षात भारताने अमेरिका, मध्य पूर्व आणि आफ्रिकेसह 20 हून अधिक आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये 7,000 मेट्रिक टनांहून अधिक मखाणा आणि मूल्यवर्धित मखाणा उत्पादनांची निर्यात केली.



## आता चंदीगढ आणि दादरा-नगर हवेलीमध्ये ई-रुपी आधारित डीबीटी

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेचे (पीएमजीकेएवाय) अनुदान, आता केंद्रशासित प्रदेश चंदीगड आणि दादरा नगर हवेलीमध्ये 'ई-रुपी' (**e-RUPI**) स्वरूपात मिळेल. ई-रुपी हे व्यक्ती-विशिष्ट आणि उद्दिष्ट-विशिष्ट डिजिटल व्हाउचर आहे. हे अनुदान, पीएमजीकेएवायच्या लाभार्थ्यांना थेट त्यांच्या डिजिटल रुपया वॉलेटमध्ये मिळेल.

हा पैसा केवळ नोंदणीकृत दुकानदारांकडून अन्नधान्य खरेदी करण्यासाठी वापरता येईल. यामुळे रोख व्यवहार, मध्यस्थ आणि अनुदानातील गैरव्यवहाराची शक्यता कमी होईल. सरकारला व्यवहारांवर तत्काळ देखरेख ठेवता येईल. यापूर्वी याचा प्रयोग गुजरात आणि पुद्दुचेरीमध्ये करण्यात आला होता. ▪



# ज्यांनी आवाजाच्या जोरावर कोट्यवधी हृदयांवर केले राज्य

*आपला मधूर आवाज आणि अद्वितीय प्रतिभेच्या जोरावर आशा भोसले यांनी भारतीय संगीत अधिक समृद्ध केले. कोणत्याही प्रकारच्या संगीतात सहज सामावून जाण्याची त्यांची अनोखी प्रतिभा प्रत्येक व्यक्तीचे मन जिंकून घेत असे. आशा भोसले यांनी हिंदी, मराठी, बंगाली, तमिळ, गुजराती यांसह अनेक भाषांमधील गाण्यांवर आणि लोकगीतांवर आपली अमिट छाप सोडली. त्यांची अतुलनीय प्रतिभा आणि समृद्ध संगीतवारसा लोकांच्या हृदयात सदैव निनादत राहील. त्यांच्या कलेचा हा अमूल्य ठेवा भावी पिढ्यांना कायम प्रेरणा देत राहील...*







8 सप्टेंबर 1933 ■ मृत्यु: 12 एप्रिल 2026

महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात 8 सप्टेंबर 1933 रोजी एका मराठी कुटुंबात जन्मलेल्या आशा भोसले यांच्या आवाजात केवळ सूरच नव्हते, तर भावनांची जिवंत अभिव्यक्तीही होती. प्रेमाचे माधुर्य, विरहाची हुरहूर, आनंदाचा खळखळाट आणि वेदनेची खोली—सर्व काही त्यात सामावले होते. त्यांच्या गाण्यांनी पिढ्यान्पिढ्यांना केवळ संगीत ऐकायलाच नव्हे, तर ते मनापासून अनुभवायलाही शिकवले. संगीतकार दीनानाथ मंगेशकर हे त्यांचे वडील आणि महान गायिका 'भारत रत्न' लता मंगेशकर त्यांच्या मोठ्या बहीण होत्या. अशा संगीतसमृद्ध कुटुंबातून आल्यामुळे त्यांचा संगीताशी बालपणीच संबंध आला. त्यांनी 1943 मध्ये वयाच्या अवघ्या 10व्या वर्षी गायनाला सुरुवात केली आणि वयाच्या 90व्या वर्षापर्यंत त्या गात राहिल्या. एक कलाकार आणि एक व्यक्ती म्हणून आपले आयुष्य त्या स्वतःच्या अटींवर जगल्या.

पॉपपासून गझलपर्यंत, डिस्कोपासून शास्त्रीय संगीतापर्यंत— अशी कोणतीही संगीतशैली नव्हती, जिला आशा भोसले यांच्या बहुआयामी प्रतिभेचा स्पर्श झाला नाही. आठ दशकांहून अधिक काळ पसरलेल्या आपल्या व्यावसायिक प्रवासात त्यांनी अनेक भारतीय भाषांमधील हजारो गाण्यांना आपला मधुर आवाज दिला आणि भारतीय संगीतसृष्टीवर अमिट छाप सोडली. असे म्हटले जाते की त्यांनी 12,000 हून अधिक गाणी गायली. संगीत क्षेत्रातील त्यांच्या अफाट योगदानाची दखल घेत त्यांना पद्मविभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार आणि राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. याशिवाय अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मानही त्यांना मिळाले. त्यांनी प्रदीर्घ काळ भारतीय कलाजगत समृद्ध करण्यात अतुलनीय भूमिका बजावली. त्यांच्या आवाजात जितकी कोमलता होती, तितकाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा आणि आपुलकीचा भाव होता. इतकेच नव्हे, तर अनेक भाषांमध्ये गायन करून त्यांनी भारतीय गीत-संगीत आणि चित्रपटसृष्टीला जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून दिले.

12 एप्रिल 2026 रोजी वयाच्या 92व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त करताना म्हटले, "भारतातील सर्वात प्रतिष्ठित आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने मला अत्यंत दुःख झाले आहे. त्यांच्या अनेक दशकांच्या असाधारण संगीतप्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य रसिकांच्या हृदयात घर केले. त्यांच्या भावपूर्ण धून असोत किंवा चैतन्यमय गीते, त्यांच्या आवाजात एक शाश्वत जादू होती. त्यांच्यासोबतच्या भेटींच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन. त्यांच्या कुटुंबीयांप्रती, चाहत्यांप्रती आणि असंख्य संगीतप्रेमींप्रती माझ्या मनःपूर्वक संवेदना. त्या पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या जीवनात निनादत राहतील."




स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा राष्ट्राला संदेश

# विकसित भारत...

## वास्तविक ध्येय: विकास आणि कल्याण

*देशाच्या 80व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला दिलेल्या संदेशात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्र उभारणीत प्रत्येक नागरिकाच्या सहभागावर भर दिला. स्वातंत्र्यलढ्यातील सैनिकांना वंदन करत त्यांनी सांगितले की, भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या लक्ष्यासह पुढे जात आहे. राष्ट्रपतींनी तरुण, महिला, शेतकरी, शास्त्रज्ञ, कामगार, खेळाडू, सुरक्षा दल आणि समाजातील विविध घटकांच्या योगदानाचे कौतुक करत देशवासीयांना संविधानाच्या मूल्यांचे आणि मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्याचे केले आवाहन...*

### स्वातंत्र्याची सार्थकता

सर्व देशवासीय स्वतंत्र भारताच्या नियतीचे शिल्पकार बनले आहेत. 'आपण भारताचे लोक' आपल्या स्वप्नांना साकार करण्याच्या संधींचा पुरेपूर उपयोग करू शकू आणि भारताला सर्वोत्तम राष्ट्र बनवण्याच्या भावनेने कार्य करू शकू— यातच स्वातंत्र्याची खरी सार्थकता आहे.

### विकसित भारताची निर्मिती

2047 या भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत विकसित भारताची निर्मिती करण्याच्या दिशेने आपण पुढे जात आहोत. 'अंत्योदय'च्या भावनेने विकासाचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे, हा आपला संकल्प आहे. आपल्या समृद्ध वारशाचे आणि स्वातंत्र्यलढ्यातील आदर्शांचे स्मरण ठेवत, आपण आधुनिक विकासाच्या मार्गावर वाटचाल करत आहोत. 'वयं राष्ट्रे जागृयाम' हे वेदवाक्य राष्ट्राच्या कल्याणासाठी सदैव जागरूक आणि कर्तव्यनिष्ठ राहण्याची आपल्याला प्रेरणा देते.

### स्वातंत्र्यसैनिकांना नमन

आपल्या स्वातंत्र्यलढ्यात संघर्ष करणाऱ्या विविध विचारसरणीच्या लोकांचे ध्येय एकच होते— भारताचे स्वातंत्र्य. 'स्वदेशी आंदोलना'दरम्यान 'वंदे मातरम्' हे प्रत्येक नागरिकाचे गीत बनले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वात अगणित देशवासी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले. बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी समाजसुधारणा आणि राष्ट्रनिष्ठेचे उच्च आदर्श मांडले. भारतमातेच्या त्या सर्व महान सुपुत्रांना मी सादर प्रणाम करते, ज्यांच्या आदर्शांवर चालून आपला देश स्वतंत्र झाला आणि पुढे गेला.

## फाळणी वेदना स्मृतिदिन

आपण 14 ऑगस्ट हा 'फाळणी वेदना स्मृतिदिन' म्हणून साजरा करतो. फाळणीशी संबंधित हिंसाचारात मृत्युमुखी पडलेल्या किंवा विस्थापनाची शोकांतिका सहन करण्यास भाग पडलेल्या आपल्या लाखो देशबांधवांचे आपण स्मरण करतो. जातीय हिंसाचारामुळे लाखो लोकांना निर्वासित व्हावे लागले आणि फाळणीची भीषणता सहन करावी लागली. तरीही त्यांनी आपली ओळख सोडली नाही.

## लोकशाहीचे प्रेरणादायी यश

भारताच्या जनतेने निर्माण केलेले आपले संविधान नागरिक सहभागावर आधारित आहे. लोकशाहीची मातृभूमी असलेल्या भारताच्या जनतेमध्ये सार्वजनिक सहभागाची भावना नेहमीच जागृत राहिली आहे. आपल्या देशाचे नागरिक नव्या जोमाने तीच भावना पुढे नेत आहेत. राष्ट्रीय मोहिमा सार्वजनिक सहभागातून पुढे नेल्या जात आहेत. हे आपल्या लोकशाहीचे एक प्रेरणादायी यश आहे.

## महिलांची आर्थिक आत्मनिर्भरता

शिक्षण क्षेत्रात आपल्या मुली प्रभावी कामगिरी करत आहेत. इतकेच नाही, तर कृषी उत्पादकता वाढविण्यात योगदान देणाऱ्या ड्रोन दीदीपासून ते हवाई दलात लढाऊ नेतृत्व करणाऱ्या महिलांपर्यंत अशा विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. नुकत्याच ग्लासगो येथे संपन्न झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताच्या 13 सुवर्ण पदकांपैकी आठ पदके भारताच्या मुलींनी जिंकली. महिलांची आर्थिक आत्मनिर्भरता वाढत आहे.

## नारी शक्ती वंदन अधिनियम

महिला विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्व करत आहेत. मतदानात महिलांचा वाढता सहभाग हे आपल्या प्रजासत्ताकाचे महत्त्वपूर्ण यश आहे. लोकसभा आणि विधानसभेत महिलांसाठी 33 टक्के प्रतिनिधित्व राखीव ठेवण्यासाठी 2023 मध्ये 'नारी शक्ती वंदन अधिनियम' कायदा मंजूर करण्यात आला आहे.

## युवा लोकसंख्या हीच आपली सर्वात मौल्यवान संपत्ती

आपल्या देशाच्या लोकसंख्येपैकी 65 टक्के लोक 35 वर्षांखालील आहेत. ही तरुण लोकसंख्या आपली सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. आपल्या देशातील तरुण प्रतिभावान, वचनबद्ध आणि कुशल आहेत. तळागाळातील विविध समस्यांवर ते जे नाविन्यपूर्ण आणि व्यावहारिक उपाय शोधतात, ते पाहून मला समाजाप्रती आणि देशाप्रती असलेली त्यांची वचनबद्धता दिसून येते.




## विद्यार्थी, भारताच्या भविष्याचे निर्माते

आपले विद्यार्थी हे भारताच्या भविष्याचे निर्माते आहेत. ज्याप्रमाणे राष्ट्रीय सुरक्षेसाठी सरकार आणि समाजाची एकजूट आवश्यक असते, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या वर्तमान आणि भविष्याच्या सुरक्षेसाठी एकत्रित प्रयत्नांची गरज असते. सार्वजनिक परीक्षा विद्यार्थ्यांसाठी संधीची दारे उघडतात. त्यामुळे सरकार या परीक्षांमध्ये सुधारणा करण्यासाठी व्यापक पावले उचलत आहे. या सुधारणांचा उद्देश सार्वजनिक परीक्षांमधील गैरप्रकार पूर्णपणे दूर करणे, परीक्षा पद्धती अधिक पारदर्शक बनवणे आणि युवकांसाठी सुरक्षित व विश्वसनीय शिक्षण सुनिश्चित करणे हा आहे.

## युवावर्गासाठी अनेक प्रकारच्या नवीन संधी

शासकीय प्रयत्न आणि नवीन आर्थिक घडामोडींमुळे तरुण वर्गासाठी असंख्य नवीन संधी निर्माण होत आहेत. या संधींची जाणीव ठेवून आपले तरुण यशाचे नवीन मार्ग आखू शकतात. तरुणांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य हा देशाच्या भविष्याचा पाया आहे. तरुण पिढी उत्साहाने पुढे जात राहील, हे सुनिश्चित करणे ही कुटुंब आणि समाजाचीही जबाबदारी आहे.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी अनेक उपक्रम

ज्येष्ठ नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. 70 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सुमारे 6 कोटी ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रति वर्ष 5 लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य लाभ उपलब्ध आहेत.

## नक्षलवादाने प्रभावित भागांमध्ये उत्साहाचे वातावरण

भारताला नक्षलमुक्त करणे हे एक मोठे यश आहे. एकेकाळच्या नक्षलग्रस्त भागांमध्ये आता उत्साहाचे वातावरण असून विकासाचा व्यापक प्रवाह वाहत आहे. बस्तर ऑलिम्पिकमध्ये खेळाडूंनी, बस्तर पंडुममध्ये कलाकारांनी आणि या कार्यक्रमांमध्ये प्रेक्षकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



## आधुनिक भारताच्या एकतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल

जेव्हा आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा फाळणीच्या गंभीर परिणामांसोबतच 550हून अधिक संस्थानांचे नवस्वतंत्र भारतात विलीनीकरण करण्याचे मोठे आव्हान समोर उभे होते. सरदार पटेलांनी राजेशाही व्यवस्था संपुष्टात आणली आणि त्यांचे आपल्या लोकशाहीत विलीनीकरण केले. एका कृतज्ञ राष्ट्राच्या वतीने मी आधुनिक भारताच्या एकतेचे शिल्पकार, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पवित्र स्मृतीस आदरपूर्वक वंदन करीत आहे.

## शिक्षण क्षेत्रातील यशाचे नवे मापदंड

आपले देशबांधव महात्मा ज्योतिबा फुले यांची 200 वी जयंती साजरी करत आहेत. महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक न्याय, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि समानता या क्षेत्रांमध्ये ऐतिहासिक योगदान दिले आहे. त्यांच्या आदर्शांना अनुसरून गेल्या काही वर्षांपासून वंचितांच्या उन्नतीच्या ध्येयाला राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आले आहे. महिला शिक्षणाच्या क्षेत्रात यशाचे नवे मापदंड प्रस्थापित झाले आहेत.

## वसुधैव कुटुंबकमचा आदर्श आपल्या परराष्ट्र धोरणाचा आधारस्तंभ

आपले परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हितावर आधारित आहे. शांतता, सहकार्य, संवाद आणि वसुधैव कुटुंबकमचा आदर्श हे आमच्या परराष्ट्र धोरणाचे आधारस्तंभ आहेत. आर्थिक सहकार्य वाढवण्यासाठी आणि परस्पर संबंध दृढ करण्यासाठी आम्ही अनेक देशांसोबत मुक्त व्यापार करार केले आहेत.

## आपल्या प्रभावशाली क्षमतेची प्रतीके

राष्ट्रीय अभिमानाचे रक्षण करण्यासाठी बांधलेले आणि मराठा लष्करी परंपरेशी संबंधित असलेले 12 किल्ले गेल्या वर्षी युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आले. या वर्षी भगवान बुद्धांच्या पहिल्या प्रवचनाचे स्थळ असलेल्या सारनाथचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला. भारत एकीकडे भगवान बुद्धांशी संबंधित आध्यात्मिक स्मारकांचे माहेरघर आहे, तर दुसरीकडे आत्मसन्मान आणि आपल्या गौरवशाली परंपरांचे रक्षण करण्यासाठी लढण्याची आपली प्रबळ क्षमता देखील तो दर्शवतो.

## पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावरील अग्रगण्य योगदान

आधुनिक विकासाच्या मार्गावर वाटचाल करत असताना भारत पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रातही जागतिक स्तरावर अग्रगण्य योगदान देत आहे. आपल्या देशाने शाश्वत विकास लक्ष्य 2030 ची काही उद्दिष्टे वेळेच्या आधीच साध्य केली आहेत. गेल्या काही वर्षांत नवीकरणीय ऊर्जेच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळाली आहे.

## नवीन रोजगार निर्मिती

आपल्या देशात महामार्ग, जलमार्ग, रेल्वे आणि हवाई मार्ग यांसारख्या आधुनिक पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विस्तार होत आहे. यामुळे नवीन उद्योगांसाठी संधी निर्माण होत आहेत, नवीन रोजगार निर्माण होत आहेत आणि गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत आहे. ■

# 2047 चा संकल्प सप्त धारा चे सामर्थ्य



लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा देशाला संबोधित करत होते, तेव्हा त्यांच्या मनात – डोक्यात केवळ गेल्या 12 वर्षांतील भारताच्या विकास प्रवासाबद्दलचे स्वाभाविक समाधानच नव्हते तर भविष्यातील एका भव्य आणि नव्या भारताच्या उभारणीचा दृढ संकल्पही होता. जेव्हा एखाद्या राष्ट्राचे नेतृत्व संवेदनशील असते, तेव्हा त्याचा विकास केवळ आकडेवारीपुरता मर्यादित राहत नाही; उलट समाधानासोबतच देशाला आणखी महान बनवण्याची इच्छा लोकांच्या हृदयात नव्या निर्मितीचे रूप धारण करते. 'राष्ट्र प्रथम' या मंत्रासह भारताने गेल्या 12 वर्षांत जो विकासाचा नवा अध्याय लिहिला आहे तोच 2047 पर्यंत भारताला एक विकसित राष्ट्र बनवण्याच्या ध्येयाचा आधारस्तंभ बनला आहे. म्हणूनच या 15 ऑगस्ट रोजी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधान मोदींनी विकासाची नवी सप्त धारा अवलंबण्याचे आवाहन केले. यासोबतच हे 13 वे संबोधन ठरले राष्ट्राच्या अखंड प्रवासाचा जयघोष...



वन्दे मातरम्।
सुजलाम् सुफलाम्
मलयजशीतलाम्,
शस्यशामलाम् मातरम्।
वन्दे मातरम्।।

शुभ्रज्योत्स्ना पुलकितयामिनीम्,
फुल्लकुसुमित
द्रुमदलशोभिनीम्,
सुहासिनीम् सुमधुरभाषिणीम्,
सुखदाम् वरदाम् मातरम्।
वन्दे मातरम्।।



या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी ज्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्य कार्यक्रमासाठी लाल किल्ल्याच्या तटबंदीवर पोहोचले, तेव्हा वंदे मातरम ची आकृती आणि संकल्परूपी उत्सवाचा रंग सगळीकडे नव्या ऊर्जेचा संचार करत होता. पहिल्यांदाच लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन राष्ट्रीय गीताचे स्वर आसमंतात निनादले, हे गीत भारताच्या अभिमानास्पद वारशाचा सन्मान करणारा क्षण नव्हता, तर 140 कोटी नागारिकांना त्या वारशाप्रमाणेच प्रेरणा देणारा क्षणही ठरला, जशी प्रेरणा स्वातंत्र्यलढ्याच्या काळात होती. एकोणिसाव्या शतकाचा शेवटचा टप्पा आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात, 'वंदे मातरम्' भारतीयत्व आणि राष्ट्रवादाच्या जागृतीचे गीत बनले होते. आता एकविसाव्या शतकातील भारत, आपल्या विराट संकल्पाच्या सिद्धीच्या दिशेने अग्रेसर होत आहे. आणि युवा शक्तीच त्याचे निर्णायक नेतृत्व करत आहे. आणि याच कारणामुळे, यावर्षी, लाल किल्ल्यावरुन होणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याची संकल्पनाच, 'वंदे मातरम् ची 150 वर्षे' आणि विकसित भारत@2047 साठी युवा शक्ती' ही होती.

जेव्हा एखादा विशेष प्रसंग, युवा शक्तीला समर्पित असेल, तर, त्याचा अर्थ हा आहे, की नवा भारत आता नवी गाथा लिहिण्यासाठी सज्ज झाला आहे. अशा काळात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन, स्पष्ट संदेश दिला की, भारताची युवा शक्ती, विकसित भारताचा संकल्प प्रत्यक्षात सिद्धीस नेण्यासाठी तयार आहे.

## युवा बनत आहेत, विकसित भारताचे सारथी

भारतातील युवकांच्या आकांक्षांना आज नवे पंख मिळत आहेत. जगातील सर्वात युवा देश असलेला भारत आज विकासाचा वाहक ठरला आहे. भारताचा युवा आता केवळ नोकरी मागणारा नाही, तर नोकरी देणारा झाला आहे. भारत आज जगातील तिसऱ्या क्रमांकाचा स्टार्ट अप व्यवस्था असलेला देश ठरला आहे. युवा आज खऱ्या अर्थाने, भारताचे सारथी बनले आहेत. केंद्र सरकारने युवकांसाठी शिक्षण, कौशल्य, उद्यमशीलतेच्या अनेक संधी गेल्या 12 वर्षात उपलब्ध केल्या आहेत. या वर्षांमधे 12 लाखांपेक्षा अधिक लोकांना रोजगार मेळाव्यातून नियुक्तीपत्रे देण्यात आली आहेत. विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी सेमीकंडक्टर उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोन्मेष यावर भर दिला जात आहे, तर दुसरीकडे, डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर, पंतप्रधान मोदी यांच्या सुशासनाचे अविभाज्य अंग बनले आहे. आज विज्ञान-तंत्रज्ञानही सुशासनाचा अनिवार्य घटक बनले आहे.

युवा सामर्थ्य केवळ एक शक्ती नाही, तिला सन्मान देण्याचे निमित्तही 80व्या स्वातंत्र्यदिन सोहळयातून मिळाले. जगातील सर्वात युवा देश असलेल्या भारताच्या मनात अनेक आकांक्षा आहेत, आणि केंद्र सरकारने गेल्या 12 वर्षात, कित्येक उपक्रम आणि योजना राबवून या आकांक्षांना नवे पंख दिले आहेत. यंदाच्या समारंभात, पाहिल्यांदाच लाल किल्ल्यावरुन, युवकांचा विशेष सन्मान करण्यात आला. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या विषयातील आंतरराष्ट्रीय ओलिंपियाड-2026 मध्ये पदके जिंकणाऱ्या 19 विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश, विज्ञानाच्या क्षेत्रात युवा शक्तीच्या यशाचेच उदाहरण आहे. या विद्यार्थ्यांना, स्वातंत्र्य दिन समारंभासाठी केवळ आमंत्रित करण्यात आले नव्हते, तर त्यांना लाल किल्ल्याच्या तटबंदीवर स्थान देऊन, विशेष सन्मान देण्यात आला होता. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाचे युवा पिढी बद्दलचे हे विचार, भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठीच्या विशेष पुढाकाराचे द्योतक ठरले आहे. या आयोजनात, युवा नवोन्मेषक, प्रधानमंत्री प्रशिक्षण योजनेचे उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी, उत्कृष्ट स्टार्टअप, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेले उत्कृष्ट युवा, माय भारत चे सर्वोत्तम स्वयंसेवक, नमस्ते, प्रधानमंत्री अजय आणि बीज योजने सोबतच, विविध योजनांच्या लाभार्थ्यांना देखील समाविष्ट करण्यात आले होते. नवा भारत, आपल्या देशातील युवा आणि इतर सर्व वर्गांना, कशाप्रकारे, नव्या संधी देऊन,





त्यांच्या आकांक्षांची पूर्तता करत आहे, हेच यातून प्रतिबिंबित होते.

## वंदे मातरम्... अभिमानास्पद वारशातून विकसित भारताचा प्रवास

लाल किल्ल्याच्या प्रांगणात केवळ वंदे मातरम् चे गायन झाले नाही, तर फुलांच्या सजावटीपासून ते तटबंदीच्या समोरच्या ज्ञानपथावर, स्वयंसेवकांची वंदे मातरम् ची आकृती, अद्भुत दृश्य दर्शवत होती. भारतीय हवाई दलाच्या एमआय-17 हेलिकॉप्टरने वंदे मातरमच्या 150 वर्षांच्या निमित्ताने, एक विशेष बॅनरसह अवकाशात झेप घेतली आणि तिथे उपस्थित असलेल्या सर्वांवर पुष्पवर्षा केली. हे केवळ वंदे मातरम् या गीताचे स्मरण नव्हते, तर नव्या भारताचा संदेश स्पष्ट आहे, की ज्याप्रकारे 'वंदे मातरम' गीत, भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या संग्रामाचे प्रतीक बनले होते, त्याचप्रमाणे, विकसित भारताचा स्पष्ट संदेश आहे की संकल्पाच्या पूर्ततेसाठी हे गीत नव्या पद्धतीने विचार करण्याची आणि पुढे जाण्याची प्रेरणा देईल. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी, बौद्धिक आणि साहित्यिक वातावरणातून, जन्मलेले वंदे मातरम् आपल्या साहित्यिक मूळापासून, पुढे जात वसाहतवादी साम्राज्य विरोधी लढा आणि सामूहिक आकांक्षा यांचे शक्तिशाली प्रतीक ठरले. हे आयोजन केवळ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या दूरदृष्टीची प्रासंगिकता दर्शवत नाही, तर देशाची सांस्कृतिक आत्मा जागृत करण्यासाठीच्या मंथनाला आकार देण्यात या गीताची भूमिका काय, त्याचा विचार करण्याची प्रेरणाही हे गीत आपल्याला देतो.

याच कारणामुळे, 80व्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी पंतप्रधान मोदी यांनी अनेक धाडसी घोषणा केल्या, ज्या अशा राष्ट्राचे संकेत देतात, जो भविष्यात केवळ पाऊल पुढे टाकण्यासाठी नाही, तर झेप घेण्यासाठी तयार आहे. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग 13व्यांदा केलेले भाषण, राष्ट्राला असलेल्या विश्वासाचेही प्रतीक आहे. या विश्वासामागे कारण हे आहे की, लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन आतापर्यंत करण्यात आलेली प्रत्येक घोषणा प्रत्यक्षात आली आहे, साकार झाली आहे.

## सर्वांगीण विकास आणि कायमस्वरूपी समाधान

प्रगतीपथावर पुढे जाणाऱ्या 12 वर्षांच्या या प्रवासातला सर्वात सुखद पैलू हा आहे की अनेक दशके, ज्या मुद्यांकडे, कायमस्वरूपी समस्या म्हणून दुर्लक्ष करण्यात आले होते, किंवा नाशिबाच्या भरवशावर सोडण्यात आली होती, त्यावर आता कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. दृढ संकल्प आणि इच्छाशक्ती, पंतप्रधान मोदी यांचे वैशिष्ट्य आहे, ज्याचा महत्वाचा आधार आहे, केंद्र सरकारचे ध्येय वाक्य आहे, 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास और सबका प्रयास'.

जम्मु काश्मीरमधून कलम 370 हटवणे असो, किंवा मग घरोघरी शौचालय, उज्ज्वला योजनेतून घरोघरी स्वच्छ इंधनाचा पुरवठा असो, नळाने पाणीपुरवठा योजना, कामगारांसाठी सुरक्षा कवच, आयुष्मान भारत अंतर्गत, 60 कोटींपेक्षा अधिक लोकांसाठी पाच लाख रुपये,



पर्यंत मोफत उपचारांची सुविधा, भारत नित्य नवे अध्याय लिहीत आहे.

अन्नदाता शेतकरी आज विकसित भारताचा आधारस्तंभ म्हणून पुढे येत आहेत. पीएम किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ यांसारख्या अनेक योजना, शेतकरी कल्याण आणि सक्षमीकरणाचा आधार ठरल्या आहेत. शेतीचा आज एका उद्योगाप्रमाणे विकास केला जात आहे.

विकसित भारताच्या निर्मितीत स्त्री शक्तीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे महिलांच्या नेतृत्वाखालील विकास, ही विकासाची नवी व्याख्या बनली आहे. सुकन्या समृद्धी योजना, बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियान, 26 आठवड्यांची मातृत्व रजा, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या समान संधी यांच्या माध्यमातून स्त्री शक्ती राष्ट्र उभारणीत भागीदार होत आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये 33 टक्के महिला आरक्षण आता वास्तव बनले आहे. त्याची लवकरात लवकर प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची वचनबद्धता पुन्हा एकदा लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून अधोरेखित करण्यात आली.

अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत, गेल्या 12 वर्षातील यश, सर्वात उपलब्धींपैकी एक आहे. कालपर्यंत देशातील ज्या भागाला, 'रेड कॉरिडॉर' म्हटले जात होते, ते आज भाग आज हरित विकासाचे प्रदेश बनू लागले आहेत. आदिवासी भागांमध्ये आता विकासाची नवी पहाट उगवत आहे.

देशात महामार्ग, रेल्वेमार्ग, विमानतळ आणि जलमार्गांचा अभूतपूर्व विस्तार झाला आहे. वंदे भारत एक्स्प्रेसने रेल्वे प्रवासाला 'स्वदेशी, वेग आणि सुविधा' या त्रिवेणीचे स्वरूप दिले आहे. पीएम गतिशक्तीने बहुपर्यायी वाहतूक जोडणीची संकल्पना प्रत्यक्षात साकार केली आहे. 'डिजिटल इंडिया'ने दुर्गम गावांपर्यंत इंटरनेट पोहोचवले असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिवर्तनाच्या नव्या युगाची सुरुवात केली आहे. युपीआयने, भारताला जगातील डिजिटल पेमेंट क्षेत्रातील अग्रगण्य देश बनवले आहे.

## सप्त धारांतून विकसित भारताला नवे सामर्थ्य

गेल्या 12 वर्षांत, भारताने सुधारणांना नवी गती दिली आहे. मात्र, विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी सातत्याने नव्या सुधारणा करत या प्रक्रियेला आणखी पुढच्या टप्प्यावर नेण्याची गरज आहे. यासाठी सरकार असो किंवा समाज, उद्योग असो किंवा उत्पादक, शेतकरी असो किंवा सामान्य नागरिक—सर्वांनी आपल्या पारंपरिक व्यवस्था आणि विचारसरणीत बदल करणे आवश्यक आहे. याच मंत्रासह पंतप्रधान मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन 'सप्तधारा'चे आवाहन केले.

सप्तधारेची पहिली शक्ती आहे- उत्पादन शक्ती.
सप्तधारेची दुसरी शक्ती आहे- कृषी आणि अन्न उत्पादन.
सप्तधारेची तिसरी शक्ती आहे- तंत्रज्ञान आणि नवोन्मेष.
सप्तधारेची चौथी शक्ती आहे- गती शक्ती.
सप्तधारेची पाचवी शक्ती आहे- संरक्षण शक्ती.
सप्तधारेची सहावी शक्ती आहे – हरित अर्थव्यवस्था, नील अर्थव्यवस्था.
सप्तधारेची सातवी शक्ती आहे- भारताची सुप्त शक्ती.

या 'सप्तधारां'च्या माध्यमातून भारताने संकल्प केला आहे की, गेल्या पाच-सात दशकांत जी कामे झाली नाहीत, ती पुढील पाच-सात वर्षांत या नव्या प्रवाहाच्या माध्यमातून पूर्ण करायची आहेत. या सप्तधारेच्या सामर्थ्याने राष्ट्राची विचारधारा आणि देशाला नवी उंची, नवी गती देण्याचा संकल्प आहे.

80वा स्वातंत्र्यदिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लाल किल्ल्याच्या तटबंदीवरुन झालेले सलग तेरावे भाषण, गेल्या 12 वर्षांत भविष्यातील विकसित भारताचा संकल्प साकार करण्याच्या दिशेने उचललेल्या पावलांचा साक्षीदार असलेला आजचा वर्तमान काळ निश्चितच सुवर्णमय इतिहास लिहिण्यासाठी सज्ज आहे, याचेच द्योतक होते.

***पंतप्रधान मोदी यांच्या भाषणात उल्लेख झालेल्या 13 क्षेत्रांचे मर्म आपण जाणून घेऊया. असे अर्थ, ज्यांनी विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या राष्ट्राला दिली आहे नवी दिशा...***

80 वा स्वातंत्र्यदिन सोहळा
मुखपृष्ठ कथा

# वंदे मातरम ची 150 वर्षे
# 80वा स्वातंत्र्यदिन

*स्वातंत्र्यानंतर प्रथमच लाल किल्ल्यावर वंदे मातरम वाजवण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याचा संबंध वंदे मातरमच्या 150व्या वर्धापन दिनाच्या ऐतिहासिक प्रसंगाशी जोडला....*

- आज आपण सर्व 80 वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. आज प्रत्येक हृदयाची धडधड वंदे मातरमच्या सुरात निनादत आहे.
- आज प्रत्येक घरात तिरंगा आहे. प्रत्येक मनात तिरंगा आहे. आणि देश उत्साह आणि आकांक्षांसह नव्या संकल्पांना घेऊन आज पुढे जात आहे.
- देश आज त्या महान सुपुत्रांचे पुण्यस्मरण करतो आहे, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग, बलिदानाची पराकाष्ठा केली.
- स्वातंत्र्यानंतर 15 ऑगस्टला लाल किल्ल्यावर पहिल्यांदा वंदे मातरमचा सूर घुमत आहे. आज ज्यावेळी आपण सर्व या देशाचे लोक वंदे मातरमची 150 वर्षे साजरी करत आहोत, त्यावेळी यापेक्षा जास्त उत्तम क्षण कोणता असू शकेल.
- गेल्या काही दिवसात देशाच्या काही भागात पुराचे थैमान होते, भूस्खलनाचा प्रकोप राहिला, अनेक कुटुंबांना याची झळ पोहोचली, त्यांचे दुःख, वेदना यांची आम्हाला पूर्णपणे जाणीव आहे. पीडित कुटुंबांना मी याची हमी देत आहे की आम्ही आणि संपूर्ण देश त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहोत.



**"आज आपण सर्व 80 वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. आज प्रत्येक हृदयाची धडधड वंदे मातरमच्या सुरात निनादत आहे. आज प्रत्येक घरात तिरंगा आहे. प्रत्येक मनात तिरंगा आहे. आणि देश उत्साह आणि आकांक्षांसह नव्या संकल्पांना घेऊन आज पुढे जात आहे."**

*(2026 च्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून दिलेल्या भाषणातील अंश)*

स्वातंत्र्य दिन 2026 चे छायाचित्र

# विकसित भारत @2047 साठी संकल्प

*2047 मध्ये स्वातंत्र्याच्या 100 व्या वर्षपूर्तीनिमित्त विकसित भारत उभारण्याचा निर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 140 कोटी देशवासियांच्या प्रयत्नांशी जोडला.*

- कोणताही देश तेव्हाच महान बनतो आणि यश मिळवतो, जेव्हा तो आपल्या स्वप्नांच्या, संकल्पांच्या आणि क्षमतांच्या बळावर पुढे वाटचाल करतो.
- आता लहान स्वप्नांनी काही चालणार नाही, मोठी स्वप्ने आपल्या विचारांचा देखील विस्तार करतात. आपले संकल्प दृढ असले पाहिजेत, ज्यावेळी संकल्प दृढ असतात, तेव्हा अडचणींमध्ये, आपत्तींमध्ये, मार्ग काढण्याचे सामर्थ्य आपोआपच प्राप्त होते.
- आपले संकल्प देखील मोठे असले पाहिजेत, कारण, ज्यावेळी स्वप्ने मोठी असतात, संकल्प मोठे असतात, त्यावेळी आपल्या सामर्थ्याची उंची देखील वाढते. आपल्या प्रयत्नांची उंची देखील वाढते, तेव्हा कुठे आपण आपली स्वप्ने साकार करू शकतो.
- देश स्वतंत्र झाला तेव्हा अनेक स्वप्ने बाळगून स्वतंत्र झाला.मात्र, आपल्याला गती प्राप्त करता आली नाही,आपल्याला वेग प्राप्त करता आला नाही,होत आहे, चालतंय, अरे होईल, बघू नंतर, यामध्येच आपण अडकून राहिलो. 2014 येईपर्यंत तर संपूर्ण जगाने आपल्याला "फ्रॅजाईल फाईव्ह" म्हणजेच अतिशय नाजूक अर्थव्यवस्थेच्या श्रेणीमध्ये टाकले होते.
- 2047 मध्ये, ज्यावेळी देशाच्या स्वातंत्र्याला 100 वर्षे पूर्ण होतील,त्यावेळी आपण एक विकसित भारत घडवूनच दाखवू; हे ध्येय 140 कोटी देशवासियांच्या प्रयत्नांनी साध्य करायचे आहे.
- प्रत्येकाने गेल्या 12 वर्षात या संकल्पासह, समर्पणासह,देशाला नव्या उंचीवर नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. 25 कोटी देशवासी, दारिद्र्य रेषा ओलांडून गरिबीतून बाहेर पडले आहेत.
- एकेकाळी आपली गणना "फ्रॅजाईल फाईव्ह"( अतिशय नाजूक अर्थव्यवस्था) म्हणून होत होती.मात्र, 12 वर्षांच्या आत आपण एक महत्त्वाची अर्थव्यवस्था, झपाट्याने विकसित होत असलेली अर्थव्यवस्था बनलो आहोत.
- आपण 2047 मध्ये एक विकसित भारत घडवू. हे उद्दिष्ट 140 कोटी नागरिकांच्या प्रयत्नांतूनच साध्य करायचे आहे.

**"आता आम्ही एक नवीन सामान्य स्थिती प्रस्थापित केली आहे; आम्ही यापुढे दहशतवाद आणि त्याला पोसणारे, त्याला बळ देणारे, यांना वेगळे घटक मानणार नाही."**

*(2025 च्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून दिलेल्या भाषणातील अंश)*



स्वातंत्र्य दिन 2025 चे छायाचित्र

# 12 वर्षांची सर्वसमावेशक वाढ
# वेगवान विस्ताराचे प्रतीक

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या 12 वर्षांत उत्पादन क्षेत्र, डिजिटल क्षेत्र आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधांमध्ये झालेल्या प्रगतीची आकडेवारी मांडली. हे बदलच आजच्या नव्या भारताच्या वेग आणि प्रगतीचा भक्कम आधार ठरले आहेत.*

- गेल्या 12 वर्षात संरक्षण उत्पादन सुमारे चार पट झाले आहे.
- खादी आणि ग्रामोद्योगाचे उत्पादन सुमारे पाच पट झाले आहे, इलेक्ट्रॉनिक उत्पादनात सुमारे सात पट वाढ झाली आहे,
- आधुनिक रेल्वे डब्यांच्या निर्मितीत 21 पट वाढ झाली, मोबाईल फोन उत्पादनात 35 पट वाढ झाली.
- इंटरनेट वापरकर्ते, इंटरनेट उपभोक्ते, जवळ जवळ चार पट झाले, पेटंट मिळण्याच्या संख्येत चार पट वाढ झाली, डिजिटल व्यवहारात 100 पट वाढ झाली.
- दरवर्षी सरासरी 15 पट जास्त वेगाने नळाद्वारे पाण्याच्या जोडण्या, सहा पट जास्त वेगाने गॅस कनेक्शन दिले.
- गरिबांसाठी शौचालये उभारण्याचे काम चारपट वेगाने, तर गरिबांना घरे देण्याचे काम तीनपट वेगाने करण्यात आले.
- हजारो अनुपालन नियम आणि शेकडो जुने कायदे रद्द करण्यात आले.
- गेल्या शतकातील कायद्यांच्या आधारे 21 व्या शतकातील प्रगतीचा प्रवास साधता येणार नाही.
- आधुनिक पायाभूत सुविधांसाठी मेट्रोचा विस्तार केला असून, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेलाही बळकटी दिली आहे.
- ज्या वेगाने आणि ज्या व्यापक स्तरावर काम झाले, ही गती, हा विस्तार आणि ही कामगिरी स्वातंत्र्यानंतर प्रथमच गेल्या दशकात देशाने अनुभवली आहे.
- जेव्हा आपल्या समोर एवढी मोठी यशोगाथा आहे, विकासाचा एवढा वेग दिसत आहे आणि देशवासीयांची क्षमता क्षणोक्षणी अधिक बळकट होत आहे, तेव्हा 2047 पर्यंत विकसित भारत बनवण्याचा संकल्प कधीही अपूर्ण राहू शकत नाही.



स्वातंत्र्य दिन 2024 चे छायाचित्र

**“आमचा एकच संकल्प आहे— Nation First म्हणजेच राष्ट्रहित सर्वप्रथम. माझा भारत महान व्हावा, याच संकल्पाला घेऊन आम्ही प्रत्येक पाऊल पुढे टाकतो.”**

*(2024 च्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून दिलेल्या भाषणातील अंश)*

# आत्मनिर्भर भारत: सेमीकंडक्टर आणि महत्त्वपूर्ण खनिजे

*आत्मनिर्भरतेला आपला दृढ विश्वास आणि श्रद्धा असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सेमीकंडक्टर आणि महत्त्वपूर्ण खनिजांच्या क्षेत्रात भारताने मिळवलेल्या नव्या सामर्थ्यावर प्रकाश टाकला.*

- **आत्मनिर्भरतेसाठी आत्मविश्वास:** गेल्या काही वर्षांत आमचा ठाम विश्वास राहिला आहे की, भारताने आता इतर देशांवर अवलंबून राहून जगता कामा नये; आपल्याला आत्मनिर्भर बनायचे आहे.
- जगात बरेच काही स्वस्त मिळते, लवकर मिळू शकते, मात्र त्यामुळे आपले सामर्थ्य तयार होऊ शकत नाही. आपल्या सामर्थ्याची कसोटी देखील लागत नाही आणि म्हणूनच आपल्याला आपल्या क्षमतेत वाढ करायची आहे. आपल्या हितांचे संरक्षण आपल्याला स्वत: करायचे आहे.
- आत्मनिर्भर भारताचा संकल्प अतिशय दृढतेने सोबत घेऊन आपण पुढे वाटचाल करत आहोत. मेक इन इंडिया, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल, या सर्व क्षेत्रात आज प्रत्येक भारतीय मनाने जोडला जात आहे.
- इलेक्ट्रॉनिक वस्तू, वैद्यकीय उपकरणे, प्रत्येकात चिप अनिवार्य आहे.
- आता भारताचे तीन सेमीकंडक्टर प्लांट सुरू झाले आहेत तिथे निर्मित उत्पादनांची निर्यात देखील सुरु झाली आहे.
- आगामी 7-8 वर्षात आणखी सुमारे आठ सेमीकंडक्टर प्लांट लवकरच सुरू होणार आहेत. हा आत्मनिर्भर भारत आपल्याला विकसित भारताच्या दिशेने जाण्याचा महामार्ग देईल.
- राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज मोहीम सुरु केली आहे अर्थसंकल्पात महत्त्वपूर्ण खनिज कॉरिडॉरची घोषणा करण्यात आली आहे. अनेक देशांसोबत करार केले जात आहेत. जगातील कित्येक देश आता या महत्त्वपूर्ण खनिजांच्या क्षेत्रात भारतावर विश्वास ठेवू लागले आहेत.

**"गुलामीच्या मानसिकतेतून बाहेर आलेला देश पंचप्राणांना समर्पित राहून एका नव्या आत्मविश्वासासह पुढे मार्गक्रमण करत आहे. नव्या संकल्पांना मूर्त रूप देण्यासाठी तो जीवाचे रान करून प्रयत्न करत आहे."**

*(2023 च्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून दिलेल्या भाषणातील अंश)*



स्वातंत्र्य दिन 2023 चे छायाचित्र

# ऊर्जा सुरक्षा : अणुऊर्जेपासून **सौर क्रांतीपर्यंत**

*ऊर्जा सुरक्षा ही काळाची गरज असल्याचे सांगून पंतप्रधान मोदी यांनी अणुऊर्जा, सौर ऊर्जा, वायू आणि हायड्रोजन ऊर्जा क्षेत्रातील भारताची कामगिरी आणि भविष्यातील संकल्प यांचा पुनरुच्चार केला...*

- चिप असो, ए आय असो किंवा माहिती संकलन केंद्र असोत, देशाला मोठ्या प्रमाणावर ऊर्जेची गरज भासेल. त्यामुळे त्या दिशेने एकापाठोपाठ एक ठोस पावले उचलण्यात आली आहेत.
- संसदेत शांती विधेयक मंजूर करून 2047 पर्यंत 100 गिगावॅट अणुऊर्जेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
- या दशकात 5 नविन अणूभट्ट्या कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट समोर ठेऊन वाटचाल सुरु आहे. यावर्षी भारताने फास्ट ब्रिडर अणु तंत्रज्ञानात प्राविण्य मिळविले.
- समुद्रकिनाऱ्याचा 99 % भाग प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला होता. मात्र, हे असेच चालू राहू शकत नाही असे आम्ही जाहीर केले.
- हे प्रतिबंधित क्षेत्र आता कार्यान्वयन क्षेत्र म्हणून खुले करण्यात आले आहे, समुद्र मंथनासाठी 85,000 कोटी रुपयांची तरतूद करून कामाला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- 2014 पूर्वी 70 शहरांमध्ये पाईप द्वारे गॅस पुरवठा उपलब्ध होता. आता 12 वर्षात त्याचा विस्तार 700 शहरांपर्यंत झाला आहे.
- 2014 पूर्वी पाईप द्वारे 20-22 लाख घरांपर्यंत गॅस पोहोचत असे, आता पावणे दोन कोटी घरांपर्यंत ही सुविधा उपलब्ध होत आहे.
- 12 वर्षांपूर्वी सौर ऊर्जा क्षमता केवळ 2 गिगावॅट होती, पण आज ती 160 गिगावॅट पर्यंत पोहोचली आहे.
- पीएम सूर्य गृह मोफत वीज योजनेअंतर्गत 50 लाख घरांमध्ये सौर उर्जेचे काम पूर्ण झाले आहे. केंद्र सरकार प्रत्येक कुटुंबाला 80,000 रुपयांची मदत करत आहे.
- रेल्वेचे विद्युतीकरण 90 वर्षात 30 % पूर्ण झाले होते पण आम्ही 10 वर्षात ते संपूर्णतया 70 % केले आहे. अशा पद्धतीने कामे व्हायला हवीत.
- देशाने आपली पहिली हायड्रोजन रेल्वेगाडी सुरू केली जी जगातली सर्वात लांब आणि सर्वात शक्तिशाली रेल्वेगाडी आहे.



स्वातंत्र्य दिन 2022 चे छायाचित्र

**"आपण ज्या निष्ठेने संकल्प घेऊन पुढे वाटचाल करत आहोत त्याला जग साक्षीदार आहे, आणि अंतिमतः संपूर्ण जगाच्या या अपेक्षा आहेत. त्या पूर्ण करण्याची क्षमता कशात आहे हे जगाला आता दिसू लागले आहे."**

*(स्वातंत्र्य दिन 2022 रोजी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून करण्यात आलेल्या भाषणातील भाग)*

# नागरिक देवा समान आहेत

## जागतिक संकटांच्या पार्श्वभूमीवर सशक्त भारत

*कोरोना विषाणूच्या महामारी पासून पश्चिम आशियातील संकटापर्यंत गेल्या 12 वर्षातील भारताच्या सखोल वैचारिक योजनांनी देश कसा सक्षम आणि सशक्त राखला हे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले...*

- कोरोना सारख्या महामारीने संपूर्ण जगाला चिंतेत टाकले, कोरोनाच्या उद्रेकातून स्थिरस्थावर झाल्यावर युद्धाच्या भीषणतेने आर्थिक समस्या निर्माण झाल्या,
- युक्रेन-पश्चिम आशिया युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या तणावामुळे पेट्रोल-डिझेल-खतांचा पुरवठा होत नसल्याबाबत अफवा पसरवण्यात आल्या.
- गेल्या दहा-बारा वर्षांतल्या योजना देशात समृद्धी आणत आहेत हे आपण पाहिले आहे. देशात आज गॅस पण आहे, पेट्रोल सुद्धा आहे आणि युरिया देखील आहे.
- एवढ्या मोठ्या संकटातही भारताने जी काही तयारी केली होती त्या सर्व गोष्टी संकटाच्या काळात उपयोगी पडल्या.
- जगभरात युरियाची किंमत 3,000 रुपये प्रति गोणीपर्यंत पोहोचली होती तरीही आम्ही शेतकऱ्यांना त्याचा अवघ्या 300 रुपयांत पुरवठा करत राहिलो.
- जगभरात आज डीएपी चा भाव 5,000 रुपयांपर्यंत पोहोचला आहे, मात्र आम्ही ते आमच्या शेतकऱ्यांना 1,350 रुपयांना देत आहोत.
- पेट्रोल, डिझेल, खते, औषधे, चिप्स आणि अगदी जमिनीसाठीही संसाधनांचा वापर हत्याराप्रमाणे करण्याची खेळी काही जणांनी केली .
- स्वावलंबित्वाच्या मंत्राचे 10 वर्षे जर योग्य रितीने पालन झाले नसते, तर या आव्हानांचा सामना आपण कसा केला असता याची कल्पनासुद्धा करू शकत नाही.
- देश जेव्हा स्वावलंबित्वाचा उद्घोष करत होता तेव्हा लोक वातानुकूलित खोल्यांमध्ये बसून जागतिकीकरणावर चर्चा करत होते.
- परंतु, गेल्या दशकभरात जगाने नोंद घेतली आहे की जिथे जागतिकीकरणाच्या चर्चा झडायच्या तिथे आता या विषयांबाबत चर्चा होणे थांबले आहे.

**"आपण कोणापेक्षाही कमी असता कामा नये. हाच कोट्यवधी देशवासीयांचा संकल्प आहे. परंतु कठोर परिश्रम आणि अतुलनीय शौर्याची जोड जोवर नसते, तोवर हा संकल्प अपूर्णच राहतो."**

*(स्वातंत्र्य दिन 2021 रोजी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणातील भाग)*


स्वातंत्र्य दिन 2021 चे छायाचित्र

# विकासाच्या नव्या सप्तसूत्रीमुळे देशाला नवीन उंची, नवीन गती प्राप्त होईल

*लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधान मोदींनी देशासमोर सामर्थ्याच्या नवीन सप्तसूत्रीचे आवाहन केले, ज्यामुळे भारताला पुढील 5-7 वर्षात विकसित राष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बळ मिळेल...*

- शतकातील एक चतुर्थांश भाग सरला आहे, पुढील एक चतुर्थांश भाग आपल्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे, आपल्या गतीत खंड पडणार नाही, आपले ध्येय निश्चित आहे आणि ते आपल्याला साध्य करायचेच आहे.
- आपल्याला आपली कार्य संस्कृती, पद्धत बदलावी लागेल आणि आपले विचारही बदलावे लागतील, आपल्या कामाच्या वेगातही बदल करावे लागतील.
- गेल्या 5-7 दशकांत जी कामं झाली नाहीत ती कामं आपल्याला येत्या 5-7 वर्षात करावी लागतील. मला विश्वास आहे की युवा शक्ती, नारी शक्ती, शेतकरी, मजूर हे स्वप्न साकार करू शकतात.
- सुधारणा ही आमच्यासाठी सक्ती किंवा केवळ एक शब्द नाही तर तो आमचा दृढनिश्चय आहे, हाच दृढनिश्चय उरी बाळगून आम्ही सुधारणेच्या मार्गावर वाटचाल करत आहोत.
- ज्या काळात भारताची शक्ती सप्तसिंधू म्हणून ओळखली जात होती त्या काळात एक विकसित भारत घडवण्यासाठी आपल्याला एका नवीन प्रवाहाची गरज आहे. मी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून शक्तीच्या या सप्तसूत्रीचे आवाहन करत आहे.
- सप्तसूत्रीच्या या सात शक्ती केवळ एका क्षेत्रातील प्रगतीसाठी नसून एका सर्वांगीण दृष्टिकोनातून राष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी आहेत.
- देश म्हणजे केवळ सरकार नाही तर देशासोबत प्रत्येक नागरिक जोडला गेला असतो. पुढच्या एका दशकात फॉर्च्यून 500 मधील 50 कंपन्या भारतीय का असू नयेत.
- जगातील सर्वोच्च 5 बँकांमध्ये भारताचीही एक बँक असायला हवी. सर्वोच्च 5 औषध कंपन्यांमध्ये 1-2 भारतीय कंपन्यांच्या नावांचीही चर्चा झाली पाहिजे.
- कायदेविषयक कंपन्या, नामांकन संस्था, सल्लागार लेखा कंपन्या आणि तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये भारताने जागतिक नेतृत्व मिळवले पाहिजे, जगाला आकर्षित करतील असे ब्रँड तयार केले पाहिजेत.



स्वातंत्र्य दिन 2020 चे छायाचित्र

**"कोरोनाच्या जागतिक महामारीच्या काळात 130 कोटी भारतीयांनी संकल्प केला, स्वावलंबी होण्याचा संकल्प आणि स्वावलंबी भारत आज प्रत्येक भारतीयांच्या तनमनात सामावला आहे."**

*(स्वतंत्रता दिवस 2020 में लाल किले की प्राचीर से दिए गए भाषण का अंश)*

# सप्तसूत्री...



## पहिली शक्ती

**उत्पादन शक्ती :** किंमत, दर्जा आणि श्रेणीत जागतिक मानकांमध्ये गुणवत्ता सिद्ध करायची आहे, दर्जा , दर्जा आणि दर्जा असा हा मंत्र असायला हवा. आपले दोषविरहित, अस्सल उत्पादन ही आपली ओळख बनली पाहिजे.

## दुसरी शक्ती

**कृषी आणि अन्न प्रक्रिया :** शेतापासून ते निर्यात बाजारपेठेपर्यंत, भरड धान्ये , मसाले, फळे, फुले जागतिक मानके बनावेत.

## तिसरी शक्ती

**तंत्रज्ञान आणि नवोन्मेष:** देशाला नवोन्मेषाचे केंद्र बनायचे आहे. पुढील पिढीच्या दळणवळण तंत्रज्ञानाचे भारत नेतृत्व करेल. मेड इन इंडिया 6G प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचले पाहिजे.

## चौथी शक्ती

**गती शक्ती :** देशांतर्गत अखंड जलद संपर्क यंत्रणेवर आपण भर दिला पाहिजे. अतिजलद रेल्वेगाडी, आधुनिक महामार्ग, अंतर्गत जलमार्ग, विमानतळ आणि बंदरांच्या नेतृत्वाखालील विकासाच्या दिशेने पुढे गेले पाहिजे.

## पाचवी शक्ती

**संरक्षण शक्ती:** संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी होण्याबाबत भारताने आणि जगाने आता अनुभव घेतला आहे आणि तसे करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. यासाठी अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, ड्रोन आणि ड्रोन विरोधी यंत्रणा, हायपरसोनिक संरक्षण यामध्ये नेतृत्वाची आवश्यकता आहे.

## सहावी शक्ती

**हरित अर्थव्यवस्था आणि नील अर्थव्यवस्था :** हरित हायड्रोजन, नवीकरणीय ऊर्जा, मत्स्य व्यवसाय, किनारी पर्यटन. जागतिक स्तरावर हरित हायड्रोजन, नवीकरणीय ऊर्जा, ऊर्जा साठवण, हरित गतिशीलता, जागतिक स्तरावर हरित उत्पादन आपण साध्य केले पाहिजे. आपल्या लांब किनारपट्टीमुळे नील अर्थव्यवस्थेतही प्रचंड संधी उपलब्ध आहे, ज्यांचा आपण उपयोग करून घेऊ शकतो.

## सातवी शक्ती

**भारताची सॉफ्ट पॉवर :** योग, आयुर्वेद, भारतांतर्गत उपचार, चित्रपट, ॲनिमेशन, गेम्स , वेव्हज परिषद हे भारताच्या सॉफ्ट पॉवरचे सामर्थ्य आहे. योगाने आज संपूर्ण जगाला भारताशी जोडले आहे.

# जागतिक व्यापार आणि भारताची विश्वासार्हता

*अवघे जग आता भारतातील स्थिर सरकारला आणि सशक्त लोकशाहीला मान्यता देते आहे. पंतप्रधान मोदींनी मुक्त व्यापार करारांच्या (एफटीए) माध्यमातून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) आणि निर्यातीसाठी नवीन संधींवर भर दिला आहे.*

- आज भारताची प्रतिमा उंचावते आहे. जागतिक स्तरावर भारत हा मान्यताप्राप्त आणि आदरणीय देश ठरतो आहे.
- 2014 सालापासून सुमारे 40 देशांसोबत मुक्त व्यापार करार केले जात आहेत, ही एक मोठी संधी आहे.
- एमएसएमईंनी ही संधी गमावता कामा नये. आपण जगापर्यंत पोहोचलेच पाहिजे. आपण वस्त्रोद्योग, यंत्रसामग्री आणि औषधनिर्माण क्षेत्रात जागतिक मानकांपेक्षा पुढे गेले पाहिजे. जगाकडून मिळणाऱ्या उत्पादनांपेक्षा आपण आणखी चांगली आणि स्वस्त उत्पादने देऊ केली पाहिजेत.
- भारताने उत्पादित केलेले प्रत्येक उत्पादन जागतिक बाजारपेठेत पोहोचले पाहिजे. मग ते आपले वस्त्रोद्योग असो, यंत्रसामग्री असो किंवा औषधे असो, आपण ही संधी गमावता कामा नये.
- लुधियानापासून ते तिरुपूरपर्यंतचे आपले वस्त्रोद्योग क्षेत्र जगभरात पोहोचू शकते.
- या मुक्त व्यापार करारामुळे (**FTA**) आज केरळपासून गुजरातपर्यंत आणि तामिळनाडूपासून बंगालपर्यंत, आपल्या किनारपट्टी भागातील आपल्या मच्छीमार बंधू-भगिनींपर्यंत, आपल्या कोळंबीच्या निर्यातीची क्षमता लक्षणीयरीत्या वाढली आहे.
- सागरी खाद्यपदार्थ जगभरात पोहोचण्याची क्षमता वाढली आहे. त्यामुळे, आपण या परिस्थितीचा फायदा घेऊन पुढे गेले पाहिजे आणि ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे मला वाटते.
- भारताकडे एक स्थिर सरकार, एक चैतन्यशील लोकशाही आणि एक मजबूत न्यायव्यवस्था आहे. आपल्या सर्वांना मार्गदर्शन करणारे भारताचे संविधान आपल्याकडे आहे आणि आता जग आपल्या सामर्थ्याला ओळखत आहे.



**"मी हे अभिमानाने सांगतो की आज प्रत्येक भारतीय म्हणू शकतो - एक राष्ट्र, एक संविधान, आणि सरदार साहेबांचे 'एक भारत – श्रेष्ठ भारत' हे स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही कार्यरत आहोत."**

*(2019 सालच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणातील भाग)*

स्वातंत्र्य दिन समारंभ 2019 चे छायाचित्र

# युवा शक्ती आणि डिजिटल क्रांती

*स्टार्टअप इंडियापासून ते एआय कौशल्यांपर्यंत, पंतप्रधान मोदींनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून युवकांना विकसित भारताचे सर्वात मोठे साधक आणि सर्वात मोठे लाभार्थी म्हणून घोषित केले.*

- विकसित भारताच्या प्रवासात युवा वर्ग महत्त्वाची भूमिका बजावतो; देशातील युवा वर्ग हा विकसित भारताचा सर्वात मोठा लाभार्थी सुद्धा आहे.
- युवकांना मोफत प्रशिक्षण दिले जात आहे आणि या उद्देशासाठी एक मोठे जाळे विकसित केले जात आहे.
- स्टार्टअप इंडिया मोहिमेत 250,000 पेक्षा जास्त स्टार्टअप्सची नोंदणी झाली आहे. भारत सरकारने 1 लाख कोटी रूपयांच्या नवोन्मेष निधीची घोषणा केली आहे.
- भारतातील खाजगी स्टार्टअप्समधील तरुणांनी जगातील पहिल्या चाचणी फेरीत त्यांचे उपग्रह आणि रॉकेट आधीच प्रक्षेपित केले आहेत.
- पंतप्रधानांनी घोषणा केली की येत्या वर्षात 10 दशलक्ष युवकांना एआय कौशल्यांमध्ये प्रशिक्षित केले जाणार आहे..
- 2004-2014 मध्ये 350 पेक्षा कमी विद्यापीठे होती; आज, 650 नवीन विद्यापीठे सामील झाली असून, ही संख्या जवळपास 1000 झाली आहे.
- 2014 पूर्वी 400 वैद्यकीय महाविद्यालये होती, त्यांची संख्या आता 850 झाली आहे. परदेशी विद्यापीठेही भारतात येत आहेत.
- मुलांमध्ये नावीन्य आणि तंत्रज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी 10,000 पेक्षा जास्त अटल टिंकरिंग लॅबची स्थापना करण्यात आली.
- 2014 पूर्वी जैवअर्थव्यवस्थेची उलाढाल 60,000 कोटी होती, जी आता 20 लाख कोटींवर पोहोचली आहे.
- 2009-10 मध्ये 1,50,000 इलेक्ट्रिक वाहने विकली गेली, तर या वर्षी 25 लाख इलेक्ट्रिक वाहने विकली गेली.
- 'मेड इन इंडिया' विमानांच्या निर्मितीमध्ये यश मिळाले आहे; 'मेड इन इंडिया' डिफेन्स ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट सी295 ने यशस्वी उड्डाण केले आहे.
- ड्रोन द्वारे स्वामित्व हक्क योजना गावांमध्ये यशस्वी ठरत असून, सुमारे सव्वा तीन कोटी कुटुंबांना याचा फायदा होत आहे.

**"एके काळी जग म्हणत असे की भारताची अर्थव्यवस्था जोखमीने ग्रासलेली आहे. आज तेच लोक, त्याच संस्था, तेच माणसे आत्मविश्वासाने सांगत आहेत की सुधारणांची गतीच भारतीय अर्थव्यवस्थेला सक्षम करत आहे."**

*(2018 सालच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणातील भाग)*



स्वातंत्र्य दिन समारंभ 2018 चे छायाचित्र

# खेळांमधून घडतो भारत
# अमली पदार्थमुक्त भारत

*2036 ऑलिम्पिक आणि 2030 राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेसाठी सज्ज होत असताना अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे पंतप्रधान मोदींचे युवकांना आवाहन...*

- जे खेळतात, ते समृद्ध होतात. आता क्रीडा मंचांवर भारताचे राष्ट्रगीत ऐकू येते आहे आणि तिरंगा फडकताना दिसतो आहे.
- भारत टॉप्स योजना, खेलो इंडिया गेम्स, युनिव्हर्सिटी गेम्स, हिवाळी खेळ, बीच गेम्स, क्रीडा-संबंधी पायाभूत सुविधा, क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा वैद्यकशास्त्र आणि क्रीडा पोषण अशा सर्व क्षेत्रांमध्ये प्रभुत्व मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.
- आम्ही 2036 ऑलिम्पिकसाठी प्रबळ दावेदार म्हणून उदयास येत आहोत आणि 2030 साली राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेचे आयोजन करणार आहोत.
- 2036 च्या ऑलिम्पिकसाठी आपल्याला खेळाडूंची गरज असेल, तर आजपासूनच 5 ते 15 वयोगटातील मुलांमधील क्रीडा प्रतिभेचा शोध घेण्यासाठी गावांमध्ये आणि शाळांमध्ये प्रतिभा शोध मोहीम राबवली जाईल.
- ऑलिम्पिकमधील सुमारे 325-350 स्पर्धांपैकी दोन-तृतीयांश स्पर्धांमध्ये भारताचा सहभागच नाही. भारत यावर लक्ष केंद्रित करेल आणि यासाठी आम्ही प्रतिभा शोध मोहीम' राबवू इच्छितो.
- अमली पदार्थांचे व्यसन ही एक मोठी समस्या बनत आहे; अमली पदार्थमुक्त भारत ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.
- देशातील सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना, देशातील आध्यात्मिक नेत्यांनी मिळून अमली पदार्थमुक्त भारतासाठी 100 आठवड्यांचा कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही मोहीम 100 आठवडे चालणार आहे. मी प्रत्येक कुटुंबाला सांगू इच्छितो की त्यांनी या मोहिमेत सहभागी व्हावे.

**"अर्जुनाने कुरुक्षेत्राच्या रणांगणावर श्रीकृष्णाला अनेक प्रश्न विचारले, तेव्हा कृष्णाने अर्जुनाला सांगितले, जशी मनाची भावना असते, तसेच कर्माचे फळ असते."**

*(2017 सालच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणातील भाग)*



स्वातंत्र्य दिन समारंभ 2017 चे छायाचित्र

# नक्षलवादाचा अंत
# मानसिक नक्षलवाद्यांचे नवे आव्हान

*चार दशकांच्या नक्षलवादाचे निर्मूलन करण्याच्या यशाबरोबरच, "मानसिक नक्षलवाद्यांना" ओळखून त्यांना वेगळे करण्याचे पंतप्रधान मोदींचे आवाहन...*

- नक्षलवाद आणि माओवादाने लाखो तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त केले आहे. चार दशके त्यांनी मोठ्या लोकसंख्येला बंदुकीच्या धाकावर ठेवले होते. सामान्य नागरिकांचे रक्षण करताना 3,500 पेक्षा जास्त पोलीस आणि सुरक्षा कर्मचारी शहीद झाले.
- 2014 साली आम्हाला संधी मिळाली, आणि आम्ही देशाला नक्षलवादापासून मुक्त करण्याचा संकल्प केला. आज नक्षलवादी आणि माओवादी हिंसेमध्ये शेवटचा श्वास घेण्याचीही ताकद उरलेली नाही.
- जिथे एकेकाळी नक्षलवाद्यांनी गोळ्या झाडल्या गेल्या, जिथली जमीन एकेकाळी रक्ताने माखली होती, त्याच नक्षलवादी भागांमध्ये आज नक्षलमुक्त क्षेत्रांमुळे विकास, विश्वास आणि प्रयत्नांचा तिरंगा उंच फडकतो आहे.
- आम्ही जंगलांमधील सशस्त्र नक्षलवाद्यांच्या धोक्यातून देशाला मुक्त करण्यात यशस्वी झालो आहोत. सशस्त्र नक्षलवादी निघून गेले आहेत, पण मानसिक नक्षलवादी संधीची वाट पाहत आहेत.
- ते हिंसाचार आणि अराजकतेला खतपाणी घालण्याचे मार्ग शोधत आहेत. समाजाची दिशाभूल करण्यासाठी ते विविध डावपेचांचा अवलंब करत आहेत. या विचारशून्य नक्षलवाद्यांना ओळखून त्यांना वेगळे पाडले पाहिजे. देशाच्या तरुण पिढीला विकसित राष्ट्र घडवण्याच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट केले पाहिजे.
- या आव्हानाला कमी लेखता कामा नये. आपल्याला या आव्हानाबाबत जास्त सतर्क राहण्याची गरज आहे. अनेक वर्षे, सत्तेच्या वर्तुळात माओवादी विचारसरणीच्या लोकांचे वर्चस्व होते. सरकारी समित्यांवर सल्लागार म्हणून काम करतानाही, या माओवादी विचारसरणीने धोरणांवर प्रभाव टाकला.



**"देशाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे. पण समस्या असल्या तरी या देशात सामर्थ्यही आहे, हे आपण विसरता कामा नये. आणि जेव्हा आपण सामर्थ्याच्या जोरावर पुढे जातो, तेव्हा आपण समस्यांवर उपाय शोधू शकतो."**

*(2016 सालच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणातील भाग)*

स्वातंत्र्य दिन समारंभ 2016 चे छायाचित्र

# सुरक्षित, सक्षम भारताची संरक्षण क्रांती

*युद्धाच्या बदलत्या स्वरूपादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मिशन सुदर्शन चक्र, संरक्षण निर्यात आणि नागरी संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणाची घोषणा केली...*

- आज युद्धाचे स्वरूप बदलत आहे. आता युद्ध केवळ सीमेवरच होईल याची शाश्वती राहिलेली नाही. आज युद्धाच्या नव्या स्वरुपाअंतर्गत सीमेच्या आत कुठे रिफायनरी, कुठे बँकिंग क्षेत्र, तर कुठे माहितीसाठा केंद्रांपर्यंत जात पायाभूत सुविधा आणि कारखाने नष्ट केले जात आहेत.
- लाल किल्ल्यावरून मी घोषणा करत आहे की येत्या काळात आपण नागरी संरक्षणाची एक बहुआयामी व्यवस्था उभी करू. त्यात आधुनिक यंत्रणांचा अंतर्भाव करू.
- संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर असणे अनिवार्य झाले आहे, नेक्स्ट जनरेशन संरक्षण तंत्रज्ञान विकसित करून जागतिक पुरवठादार बनायचे आहे.
- आधुनिक संकटांपासून नागरिकांचे रक्षण करण्यासाठी काय व्यवस्था असू शकते, यासाठी नागरी संरक्षणाशी संबंधित आधुनिक आव्हानांवर मात करू शकेल असे स्वेच्छेने आलेल्यांचे एक खूप मोठे दल आपण उभारणार आहोत.
- ड्रोन, ड्रोन प्रतिबंधक यंत्रणा आणि हायपरसॉनिक संरक्षण तंत्रज्ञानामध्ये आघाडी घ्यावी लागेल. सायबर सुरक्षा ही देखील आज घराघरांची समस्या बनू लागली आहे. या क्षेत्रातही युवा वर्गातील क्षमतांचा उपयोग करून घ्यायचा आहे.
- मिशन सुदर्शन चक्राच्या बाबतीत वेगाने काम सुरू आहे. संरक्षण क्षेत्रातील निर्यात जवळपास 50 पटीने वाढली आहे, सुमारे 100 देशांमध्ये आपली शस्त्रास्त्रे पोहोचत आहेत. जागतिक पटलावर भारताचे स्थान हळूहळू वाढते आहे.



**लोकशाहीत लोकसहभाग ही सर्वात मोठी संपत्ती असते, जर सव्वाशे कोटी देशवासीयांच्या सहभागाने आपण देश चालवला तर, देश प्रत्येक क्षणी सव्वाशे कोटी पावले पुढे जात राहील आणि म्हणूनच, Team इंडियाच्या या रूपात लोकसहभागाला बळ दिले गेले आहे.”**

*(2015 च्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणाचा अंश)*

स्वातंत्र्यदिन 2015 चे छायाचित्र

# स्त्री शक्ती, सामाजिक सुरक्षा आणि जनगणनेचे आवाहन

*मुलींनी साध्य केलेल्या यशापासून ते महिला आरक्षण आणि जनगणनेतील सहभागापर्यंत, पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रउभारणीत प्रत्येक नागरिकाने सहभाग देण्याचे आवाहन केले...*

- लढाऊ विमान असो वा नागरी विमान वाहतूक क्षेत्र, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताचे (स्टेम) शिक्षण असो वा लष्कर, आपल्या मुली सर्वात पुढे दिसत आहेत.
- साणंद इथल्या सेमीकंडक्टर प्रकल्पात देशाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेल्या आदिवासी मुली काम करत आहेत.
- ज्या गावांतील मुलींना पारपत्राबद्दलही माहित नव्हते, त्या परदेशात प्रशिक्षण घेऊन आल्या आहेत. आज त्या चिप निर्मिती करण्याचे काम करत आहेत, त्यांच्या आत्मविश्वासाने मला खूपच समाधानी वाटते आहे.
- 3 कोटी भगिनींना लखपती दिदी बनवण्याचे उद्दिष्ट पार केले आहे, आता 6 कोटींचे उद्दिष्ट आहे.
- संसदेत नारी शक्ती वंदन अधिनियम मंजूर केला होता. लवकरात लवकर आपल्या माता भगिनींना विधानसभा आणि लोकसभेत 33% प्रतिनिधित्व मिळावे, त्यांना भारताचे धोरण आखून त्यात आपले योगदान देता यावे.
- 2014 पूर्वी केवळ 25 कोटी लोकांनाच सामाजिक सुरक्षा कवचाचा लाभ मिळत होता, आता या सामाजिक सुरक्षा कवचाच्या लाभाची व्याप्ती 100 कोटी लोकांपर्यंत विस्तारली आहे.
- आयुष्मान भारत योजनेअंतर्गत 70 पेक्षा जास्त वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना 5 लाख रुपयांपर्यंत मोफत औषधोपचारांची व्यवस्था करण्यात आली असून, यामुळे 2 लाख कोटी रुपयांची बचत झाली आहे.
- देशात जनगणनेचे काम सुरू आहे, नागरिक आता आपली माहिती मोबाईल फोनद्वारे डिजिटल पद्धतीने भरू शकतात.
- लाल किल्ल्यावरून पंच प्रणांबद्दल चर्चा केली होती. या पंच प्रणांनी देशाला आत्माभिमानाच्या दिशेने पुढे वाटचाल करण्यासाठी तसेच आखलेली उद्दिष्टे पार करण्याच्या क्षमतेला खूप मोठे बळ दिले आहे.
- स्वत:पेक्षा राष्ट्राचे हित वर असावे आणि कर्तव्य हीच आपली ओळख असावी.

**"माझ्या देशवासीयांनो, माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा, मी तुम्हाला विश्वास देतो. आतापर्यंत केलेली पापे आणि तो मार्ग सोडा, सौहार्द आणि बंधुत्वाच्या मार्गाचा अंगिकार करा. आणि आपण देशाला पुढे नेण्याचा संकल्प करूया. मला विश्वास आहे की आपण हे नक्कीच करू शकतो."**

*(2014 च्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणाचा अंश)*



स्वातंत्र्यदिन 2014 चे छायाचित्र

फाळणी वेदना स्मृती दिन

# भारताची एकता, अखंडता आणि शांतता राखण्याचा दृढ संकल्प

*देशाच्या फाळणीचे दुःख कधीही विसरता येऊ शकत नाही. द्वेष आणि हिंसाचारामुळे लाखो लोकांना विस्थापित व्हावे लागले आणि आपला जीवही गमवावा लागला. त्या लोकांचा संघर्ष आणि बलिदानाच्या स्मरणार्थ 14 ऑगस्ट हा दिवस फाळणी वेदना स्मृती दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेण्यात आला. फाळणीच्या वेदनेचा हा स्मृती दिन आपल्याला भेदभाव, वैमनस्य आणि दुर्भावनेचे विष संपवण्यासाठी प्रेरणा तर देतोच, शिवाय यामुळे मानवी संवेदनाही बळकट होतात...*



## देशाला सहन करावा लागला फाळणीचा आघात

भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यदिन, जो दरवर्षी 15 ऑगस्ट रोजी साजरा केला जातो, हा दिवस कोणत्याही राष्ट्रासाठी आनंदाचा आणि अभिमानाचा प्रसंग असतो. मात्र, स्वातंत्र्याच्या गोडीसोबतच देशाला फाळणीचा आघातही सहन करावा लागला. नव्या स्वतंत्र भारतीय राष्ट्राचा जन्म फाळणीच्या हिंसक वेदनांसोबत झाला. या वेदनांनी लाखो भारतीयांवर दुःखाचे कायमस्वरूपी व्रण सोडले. फाळणी ही मानवी इतिहासातील सर्वात मोठ्या विस्थापनांपैकी एक आहे. सुमारे 2 कोटी लोकांना या फाळणीचा फटका बसला. लाखो कुटुंबांना आपली मूळ गावे, वस्त्या तसेच शहरे सोडावी लागली आणि निर्वासित म्हणून नवीन आयुष्य जगण्यास भाग पाडले गेले.



## सर्व देशवासीयांना अंतःकरणापासून वंदन : पंतप्रधान मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, आपण फाळणी वेदना स्मृती दिन पाळत आहोत. फाळणीचा फटका बसलेल्या सर्व लोकांच्या धैर्याचे आपण स्मरण करतो. इतिहासातील तो क्षण अनेक आयुष्ये उद्ध्वस्त करणारा होता. कुटुंबे उघड्यावर आली, लोकांनी आप्तस्वकीयांना गमावले आणि असह्य वेदना सहन केल्या. या सर्वांवर मात करत लोकांनी शून्यातून आपले आयुष्य पुन्हा उभे केले, आपत्तीचे यशात रूपांतर केले आणि राष्ट्राच्या प्रगतीत अमूल्य योगदान दिले. त्यांच्या जीवन प्रवासाच्या गाथा आपल्याला मानवी जगण्याच्या जिद्दीच्या सामर्थ्याचे स्मरण करून देते. हीच आशा आहे. हा दिवस आपल्या देशात सौहार्द आणि बंधुभाव टिकवून ठेवण्याच्या आपल्या संकल्पाला आणखी दृढ करेल. आपण सर्वजण मिळून एका विकसित भारताच्या निर्मितीच्या दिशेने काम करू. फाळणीच्या वेदनेच्या स्मृती दिनानिमित्त त्या सर्व देशवासीयांना अंतःकरणापासून वंदन, ज्यांनी त्या भीषण काळातून बाहेर पडत देशाच्या प्रगतीत अमूल्य योगदान दिले. त्यांनी आपल्या धैर्याने आणि क्षमतेने दाखवून दिले की कठीण परिस्थितीतही संकल्प कसे सिद्धीस नेले जातात. चला, सौहार्द आणि एकतेच्या राष्ट्रीय भावनेला अधिक दृढ करू या.



### एक भारत, श्रेष्ठ भारत हेच आपले सर्वोच्च ध्येय बनावे : अमित शाह

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह म्हणाले की, 14 ऑगस्ट 1947 हा दिवस इतिहासातील अशा अत्यंत क्रूर अध्यायाचा साक्षीदार आहे, ज्यामुळे अमानुष वेदना सहन करत लाखो लोकांना आपला जीव गमवावा लागला. कोट्यवधी लोकांना घर, मालमत्ता आणि आप्तस्वकीयांना सोडून विस्थापित व्हावे लागले. देशाच्या फाळणीची ही वेदना इतिहास कधीही विसरू शकणार नाही. या फाळणीच्या वेदनेत आपला जीव गमावणाऱ्या आणि अत्याचारांविरुद्ध संघर्ष करणाऱ्या सर्व लोकांना मी श्रद्धापूर्वक वंदन करतो. मोदी सरकार फाळणी वेदना स्मृती दिनाच्या माध्यमातून या वेदनेच्या आठवणी नव्या पिढीपर्यंत पोहोचवत आहे, जेणेकरून देशाला तोडणाऱ्या शक्ती पुन्हा कधीही यशस्वी होऊ नयेत आणि एक भारत, श्रेष्ठ भारत हेच आपले सर्वोच्च ध्येय बनावे.



### सक्षम, समरस आणि संवेदनशील भारत घडवणे आपले कर्तव्य : राजनाथ सिंह

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, फाळणी वेदना स्मृती दिन आपल्याला भारताच्या फाळणीच्या वेदनांचे स्मरण करून देतो. या वेदनेमुळे लाखो कुटुंबांच्या आयुष्याला अथांग दुःख, विस्थापन आणि अनिश्चिततेने व्यापून टाकले होते. हा केवळ इतिहासातील एक वेदनादायी अध्याय नाही, तर ज्यांनी आपले घर दार, मालमत्ता आणि आप्तस्वकीयांना गमावूनही आयुष्य पुन्हा सावरण्याचा संकल्प दाखवला, त्या अगणित लोकांच्या संघर्षाचे, धैर्याचे, त्यागाचे आणि संयमाच्या आठवणी देखील आहेत. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की, इतिहासातील वेदना केवळ स्मरणात जपणे पुरेसे नाही, तर त्यातून शिकून ज्या भारतात फाळणीची वेदना पुन्हा कधीही कोणत्याही समाजाला सहन करावी लागणार नाही, असा सक्षम, समरस आणि संवेदनशील भारत घडवणे हे आपले कर्तव्य आहे. देशाच्या फाळणीच्या वेदनांमध्ये आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञात लोकांना आणि आपल्या जन्मभूमीपासून विस्थापित झालेल्या अगणित कुटुंबांना माझी विनम्र श्रद्धांजली. ■






# अनुकूल वातावरणाद्वारे औद्योगिक क्रांतीची नवी भरारी

*विकासासाठी पायाभूत सुविधांबरोबरच व्यापक औद्योगिक परिसंस्था आणि अनुकूल वातावरण गरजेचे आहे. आंध्र प्रदेशातही अशीच वातावरण निर्मिती होत आहे. म्हणूनच इथे गुंतवणूक करायला जगभरातील अनेक मोठ्या कंपन्या उत्सुक आहेत. विकासाची हीच प्रक्रिया पुढे चालू ठेवत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंध्र प्रदेशमध्ये 17,900 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विकास प्रकल्पांचे केले उद्घाटन आणि पायाभरणी...*



पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते अल्लुरी सीताराम राजू विमानतळाच्या उद्घाटनाचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

आंध्र प्रदेशच्या औद्योगिक क्षेत्राच्या सर्वसमावेशक परिवर्तनाचा दृष्टिकोन मांडताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, सॉफ्टवेअर क्षेत्रात आपली ओळख निर्माण केलेले हे राज्य एक सक्षम उत्पादन केंद्र म्हणूनही विकसित होईल. यामुळे रोजगार आणि तंत्रज्ञानाधारित उद्योगांसाठी भविष्यात एक नवीन वातावरण निर्मितीही होईल. स्वर्णिम आंध्र प्रदेशच्या दृष्टिकोनाला चालना देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 ऑगस्ट रोजी विजयनगरम जिल्ह्यातील भोगापुरम येथे 17,900 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटन केले.

आदिवासी समाजाचे महान नेते अल्लुरी सीताराम राजू यांना आदरांजली वाहताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, या पवित्र भूमीवर उद्घाटन झालेले नवीन विमानतळ हे प्रादेशिक विकासासाठी एक महत्त्वाची धावपट्टी आणि तरुणांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक शक्तिशाली लाँच पॅड आहे. पंतप्रधानांनी नवीन विमानतळाला महान स्वातंत्र्यसैनिक अल्लुरी सीताराम राजू यांचे नाव देण्याच्या सरकारच्या औपचारिक निर्णयाची घोषणा केली. ही अविस्मरणीय आदरांजली या विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाच्या मनात देशभक्तीची खोल भावना जागृत करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आंध्र प्रदेशच्या विकासासंदर्भात पंतप्रधान मोदींनी मांडलेले महत्त्वाचे मुद्दे...

- सध्या सुमारे 1 लाख कोटी रुपये खर्चाच्या रेल्वे प्रकल्पांवर काम चालू आहे.
- संपूर्ण रेल्वे नेटवर्कचे विद्युतीकरण पूर्ण झाले असून 70 हून अधिक रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण सुरू आहे.
- सॉफ्टवेअर आणि तंत्रज्ञान क्षेत्रात येथील तरुणांनी मिळवलेल्या जागतिक ओळखीचे कौतुक केले.
- देशातच तरुण प्रतिभेला संधी उपलब्ध करून देऊन तिच्या क्षमतेचा अधिकाधिक उपयोग सुनिश्चित करण्याची गरज आहे.
- आता सरकारचे मुख्य लक्ष सेमीकंडक्टर सारख्या भविष्याभिमुख तंत्रज्ञानाधारित उद्योगांवर आहे.
- गुगलच्या 15 अब्ज डॉलर्सच्या भव्य संकुलाच्या घोषणेचा संदर्भ देत ते म्हणाले की, राज्यात जागतिक गुंतवणूकदारांची रुची वाढत असल्याचे हे एक स्पष्ट द्योतक आहे.
- जगभरातील अनेक जागतिक कंपन्यांना येथे नवीन संधी दिसत आहेत, ज्यामुळे राज्यातील आणि देशातील तरुणांना मोठा फायदा होईल.
- केंद्र सरकार नक्कापल्ली येथे एक फार्मा पार्क उभारण्यासाठी मदत करत आहे.
- रायल सीमा परिसरात अक्षय ऊर्जा क्षेत्रासाठी पाच लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक आकर्षित झाली आहे.
- पंतप्रधान मोदींच्या राज्यातील शेवटच्या तीन दौऱ्यांदरम्यान 2 लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

- **नुकताच 29,000 कोटी रुपयांच्या प्रचंड गुंतवणुकीसह उडान योजनेचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला आहे.**

### परिचालित विमानतळ






*आज, देश नील अर्थव्यवस्थेला सातत्याने बळकट करत आहे. या संपूर्ण प्रदेशाला किनारी आर्थिक कॉरिडॉर म्हणून विकसित करणे, हे आमचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने, विशाखापट्टणम ते कृष्णापट्टणम पर्यंतच्या आपल्या जुन्या बंदरांचे आधुनिकीकरण केले जात आहे. याव्यतिरिक्त, आम्ही मुल्लापेटा आणि रामायापट्टणम येथे नवीन बंदरे देखील बांधत आहोत.*

*-नरेंद्र मोदी, पंतप्रधान*

# जागतिक विकासाला गतिमान करणारे भारतीय युवा

*आज देशातील तरुण पिढी जागतिक विकासाला नवी चालना देत आहे. स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील भारत घडवणे ही सध्याच्या पिढीची प्राथमिक जबाबदारी आहे. या तरुण पिढीच्या जागृतीचे अग्रदूत असलेल्या स्वामी विवेकानंदांच्या नावाने कर्नाटकातील म्हैसूर येथे "स्वामी विवेकानंद सांस्कृतिक युवा केंद्र - विवेका स्मारक" स्थापन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 ऑगस्ट रोजी याचे उद्घाटन केले...*



पंतप्रधान मोदी यांच्याद्वारे विवेका स्मारकाच्या उद्घाटनाचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

रामकृष्ण मिशनच्या शिकवणीतील आपल्या गहन आध्यात्मिक उगमाचा उल्लेख करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सुरुवातीच्या दिवसांपासून ते सध्याच्या जबाबदाऱ्यांपर्यंतच्या वैयक्तिक प्रवासावर या संस्थेचा किती मोठा प्रभाव होता, हे सांगितले. नव्याने बांधलेल्या स्वामी विवेकानंद सांस्कृतिक युवा केंद्र – 'विवेक स्मारक'च्या वारशाचा गौरव करताना, पंतप्रधान मोदींनी महान संत कुवेंपूंसारखे स्थानिक विद्वान आणि शहराचा बौद्धिक इतिहास यामधील अनन्य ऐतिहासिक संबंधांनाही नमन केले.

130 हून अधिक वर्षांपूर्वी, म्हैसूरच्या तत्कालीन महाराजांनी कशा प्रकारे एका तरुण, भटक्या संन्याशाला ओळखून त्याची मदत केली होती याची आठवण पंतप्रधान मोदींनी सांगितली. हे एक महत्त्वपूर्ण सहकार्य होते, ज्याचा उल्लेख स्वामी विवेकानंदांनी नंतर अमेरिकेकडे अत्यंत कृतज्ञतेने केला. पंतप्रधान मोदी म्हणाले, "इतरांसाठी जगणाराच खऱ्या अर्थाने जगतो" याच मंत्राने आश्रमाने आपल्या स्थापनेची गौरवशाली शताब्दी पूर्ण केली आहे.

स्वामी विवेकानंदांच्या काळातील भारतीय तरुणांच्या पराधीन स्थितीची तुलना आजच्या त्यांच्या जागतिक प्रभावाशी करताना, पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्या तत्त्वज्ञाने युवा शिक्षणाला राष्ट्र उभारणीचा मुख्य पाया मानले होते. एके काळी गुलामगिरीच्या बेड्यांनी जखडलेले भारतीय तरुण आज जगभरात अभूतपूर्व प्रगती घडवून आणत आहेत.

> *"स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील भारत साकारणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे."*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## युवकांच्या संदर्भात पंतप्रधान मोदी म्हणाले...

- 14,000 हून अधिक पीएम श्री शाळा
- 10,000 हून अधिक अटल टिंकरिंग लॅब
- आयआयएम आणि आयआयटींच्या संख्येत वाढ
- एमबीबीएसएस वैद्यकीय जागांची संख्या जवळपास 1.40 लाखावर पोहोचली आहे

देशाला जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था आणि दुसरे सर्वात मोठे मोबाईल उत्पादन केंद्र बनवण्याचे श्रेय युवकांना जाते. आज भारत आपल्या युवकांच्या प्रचंड क्षमतेच्या जोरावर एआय, डीप टेक, अंतराळ तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रांमध्ये यशाचे नवे आणि सोनेरी अध्याय लिहीत आहे. आत्मनिर्भर भारत अभियान असो वा मेक इन इंडिया, त्यांच्या अंतिम यशामागील प्रेरक शक्ती ही विशेषतः भारतातील युवकांची शक्ती आहे. ■



केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

# गुवाहाटी-तेजपूर महामार्ग आणि गोबरधन योजनेला मंजुरी

*ईशान्य भारतातील संपर्क व्यवस्था वाढवण्यासाठी आणि देशाची पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी, केंद्रीय मंत्रिमंडळाने आसाममधील सुमारे 136 किलोमीटर लांबीच्या चार पदरी गुवाहाटी-तेजपूर कॉरिडॉरच्या विकासाला मंजुरी दिली आहे. तसेच, ऊर्जा क्षेत्र मजबूत करण्यासाठी आणि देशातील बायोगॅस उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी 'गोवर्धन योजने'ला मंजुरी देण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या या दोन निर्णयांमुळे ईशान्य भारतातील संपर्क व्यवस्थेला चालना मिळण्याबरोबरच, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि ऊर्जा सुरक्षा मजबूत होईल...*

**निर्णय : आसाममधील गुवाहाटीजवळ राष्ट्रीय महामार्ग 15 ला लागून असलेल्या, बैहाटा चारियाली ते तेजपूर दरम्यान 15.11 किमी लांबीचा मंगलदोई बायपास वगळून, 4-पदरी रस्त्याच्या बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे.**

**परिणाम :** या प्रकल्पामुळे प्रवासाचा सरासरी वेग जवळपास दुप्पट होऊन प्रवास अवधी निम्मा होईल आणि एकूणच रस्ता सुरक्षेत सुधारणा होईल. इंधनाचा वापर कमी होईल आणि वाहनांचा परिचालन खर्च कमी होईल. यामुळे प्रादेशिक गतिशीलतेला आणि सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळेल.

- या प्रकल्पामध्ये 15 मोठे पूल, 30 छोटे पूल, 19 उड्डाणपूल आणि तेजपूर बायपासवर पुलाखालून हत्तींना ये-जा करण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्याची तरतूद आहे.
- 8,970.20 कोटी रुपये खर्चाने 135.87 किलोमीटर लांबीचा रस्ता बांधण्यात येईल.
- तेजपूर बायपासवर 4.9 किलोमीटर लांबीची आपत्कालीन लँडिंग सुविधा विकसित केली जाईल.
- आसाम आणि अरुणाचल प्रदेशातील प्रमुख आर्थिक, सामाजिक आणि लॉजिस्टिक्स केंद्रे अखंडितपणे जोडली जातील.

**निर्णय : कॉम्प्रेस्ड बायोगॅससाठी राष्ट्रीय एकात्मिक योजना असलेल्या 'गोबरधन' ला 23,731 कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीसह मंजुरी**

**परिणाम :** देशाच्या जैविक संपत्तीचे स्वच्छ ऊर्जा, ग्रामीण समृद्धी आणि आर्थिक विकासात रूपांतर करणारी एक ऐतिहासिक राष्ट्रीय योजना. या योजनेची अंमलबजावणी आर्थिक वर्ष 2026-27 ते 2035-36 पर्यंत केली जाईल.

- खात्रीशीर खरेदी, स्थिर दर, भांडवली सहाय्य आणि पाइपलाइन जोडणीद्वारे कॉम्प्रेस्ड बायोगॅस उत्पादनाला गती देण्यासाठी एकात्मिक आराखडा.
- देशांतर्गत कॉम्प्रेस्ड बायोगॅस उत्पादन जवळपास दहा पटीने वाढवण्याचे उद्दिष्ट, देशाची ऊर्जा सुरक्षा मजबूत होईल.
- शेतकरी, ग्रामीण उद्योजक, खाजगी गुंतवणूक, कचऱ्यातून संपत्ती आणि आत्मनिर्भर भारताला मोठी चालना.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.




# ‘युवा’ हाच प्रत्येक निर्णयाचा आधार

*आजच्या काळामध्ये देशापुढे आणि जगापुढे असलेली वेगवेगळी आव्हाने पाहता, आपल्यावरही काही वेगळ्या जबाबदाऱ्या आहेत. आपल्या जीवनातील आगामी 30 -35 वर्षांमध्ये जे काही केले जाणार आहे, ते कार्य युवकांकडून केले जाईल. विकसित भारताच्या प्रवासावर या युवकांचाच मोठा प्रभाव असेल. याच कारणामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आयआयटी दिल्लीच्या दीक्षांत कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना म्हणाले की, आपण घेत असलेल्या प्रत्येक निर्णयाचा आपल्या देशाला नेमका काय लाभ होणार आहे, याचा विचारच त्या निर्णयाचा आधार असला पाहिजे. आज भारत... आर्थिक स्वावलंबन, तंत्रज्ञानातील स्वावलंबन, औद्योगिक स्वावलंबन यासाठी कार्यरत आहे. याच भक्कम पायावर एका भव्य आणि विकसित भारताचे करायचे आहे निर्माण...*

विकसित भारताच्या या प्रवासामध्ये युवावर्गाची खूप मोठी, महत्वाची भूमिका असणार आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, देशातील युवक जितका जास्त सशक्त होईल, तितकाच देशही सशक्त, मजबूत होईल. हा विचार करून ज्या क्षेत्रांमध्ये युवकांना आधी बंदी असे, अशा अनेक नवीन क्षेत्रांच्या वाटा आता सरकारने मुक्त केल्या आहेत. सरकारच्या आधुनिक धोरणांमुळे आज देशांमध्ये युवकांसाठी नवनवीन क्षेत्रे विकसित होत आहेत.

आयआयटी दिल्लीच्या 57 व्या दीक्षांत समारंभामध्ये पंतप्रधानांनी गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेच्या सर्वाधिक प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविले. आयआयटी दिल्लीच्या सोनीपत परिसरामध्ये स्थापन केलेल्या एआय-

# जीवनविषयक व्यवहार ज्ञान पंतप्रधान मोदी यांनी विद्यार्थ्यांबरोबर केले सामायिक....

- आयआयटी संस्था परिसरातील जीवन आणि परिसराबाहेरचे जीवन, या दोन्हीमध्ये खूप मोठे अंतर असते. आयआयटी परीक्षेसाठी विशिष्ट अभ्यासक्रम असतो. परंतु जीवनाच्या परीक्षेत सगळे काही अभ्यासक्रमाच्या बाहेरचे प्रश्न असतात.
- थोडे आठवून पहा, महाविद्यालयाच्या परिसरामध्ये सगळे 'फंडे क्लियर' होत असतात... सगळे काही आधीच निश्चित केलेले असते. परंतु आयुष्याचे तसे नाही... इथे काही विशिष्ट अभ्यासक्रम नसतो की, कोणतीही प्रश्नपत्रिका नसते. अनेकवेळा तर कोणी हेही सांगत नाही की, नेमका-खरा प्रश्न काय आहे किंवा होता. इथे प्रश्नही आपणच ओळखावा लागतो.
- प्रत्येक पिढीसमोर त्या त्या काळातील आव्हाने असतात. प्रत्येक पिढीवर काही राष्ट्रीय जबाबदारीही असते. आपल्या देशाने गुलामगिरीचा कालखंडही अनुभवला आहे. त्यावेळी त्या पिढीसमोर फक्त एकच लक्ष्य होते - ते म्हणजे, भारताला स्वतंत्र करणे.
- ज्यावेळी आपण मोठे ध्येय साध्य करण्याचे निश्चित करतो, त्यावेळी लक्ष विचलित करणारी मोठी गोष्टही आपल्यासमोर येते. यामध्ये एक घडते की, एकमेकांमध्ये तुलना केली जाते, त्यामुळेही लक्ष विचलित होते. आजच्या समाज माध्यमांच्या काळामध्येही अशी तुलना संपुष्टात येत नाही.
- लक्षात ठेवा, आयुष्य काही 'नेतृत्व करणारा फलक' नाही. तुमची खरी स्पर्धा इतर कुणाशीही नाही, तर स्वतःशीच आहे. प्रत्येक दिवस कालच्यापेक्षा अधिक चांगला बनविण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.
- आजच्या जगातील धोरणात्मक समीकरणे खूप वेगाने बदलत आहेत. जागतिक महासत्तेचे संतुलनही क्षणोक्षणी बदलत आहे. यामागे सर्वात मोठी शक्ती ही तंत्रज्ञानाच्या प्रचंड वाढत्या वेगाची आहे.



जो शिकेल, तोच जिंकेल. जो कोणी नव्या आव्हानांवर उत्तर शोधण्याचे धाडस दाखवेल, त्याच्यासाठी ही आव्हाने संधी बनतील.

> *आयुष्यभर कुतूहल, उत्सुकता कायम असावी, आपल्यामध्ये शिकण्याची उर्मी असावी. एखादी गोष्ट जर कोणताही विचार केल्याशिवाय स्वीकारली जात असेल तर... त्याचे परीक्षण करावे. त्यावर प्रश्न उपस्थित केले जावेत. परंतु फक्त प्रश्न विचारून थांबू नका. त्यावर उत्तर शोधण्याचे धाडसही दाखवा. अशा विचारामुळे तुमची वेगळी ओळख तयार होईल.*
>
> *-नरेंद्र मोदी, पंतप्रधान*

सक्षम उच्च -गुणवत्तापूर्ण सुपर कॉम्प्युटिंग सुविधा 'परम प्रज्ञा'चे उद्‌घाटनही करण्यात आले. या सुपर कॉम्प्युटिंग सुविधेमुळे संस्थेच्या कृत्रिम प्रज्ञा, डेटा विज्ञान, उन्नत कॉम्प्युटिंग आणि आंतरविद्याशाखीय संशोधन क्षमता यामध्ये उल्लेखनीय कार्य करणे शक्य होईल, अशी अपेक्षा आहे.

पंतप्रधान मोदी यांनी मागच्या वेळेस आयआयटी दिल्ली दीक्षांत कार्यक्रमामध्ये आभासी माध्यमातून मार्गदर्शन करताना अंतराळ क्षेत्रामध्ये होत असलेल्या सुधारणांविषयी चर्चा केली होती. त्याचे स्मरण करून सांगितले की, आतापर्यंत या क्षेत्रामध्ये जवळपास संपूर्ण कार्य सरकार करीत होते. परंतु आज त्याच अंतराळ क्षेत्रामध्ये हजारो युवकांसाठी नवनवीन संधींचे आकाश मुक्त झाले आहे. आज आपले युवक 'लॉन्च व्हेईकल' बनवत आहेत. रॉकेट लॉन्च करीत आहेत. ज्या गोष्टी जगातील मोजक्या देशांना करणे शक्य आहे, ती कामगिरी आपल्या देशातील युवक करून दाखवत आहेत. ■

पंतप्रधान मोदी यांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करावा.

# यूपीआय सेवा निःशुल्कच राहणार...




*डिजिटल देव-घेव व्यवहारांना अधिक सशक्त आणि पारदर्शक बनविण्याच्या दिशेने केंद्र सरकारने अनेक महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक 2026 ला मंजुरी मिळाल्यानंतर 'यूपीआय'शी संबंधित शुल्कांविषयी नवीन नियमांची रूपरेखा स्पष्ट झाली आहे. सर्वसामान्य ग्राहक आणि 'पर्सन टू पर्सन' (पी2पी) देव-घेव व्यवहारांसाठी यूपीआय सेवा पूर्णपणे निःशुल्क असणार आहे. वित्त मंत्री निर्मला सीतारमण यांनी स्पष्ट केले की, डिजिटल देव-घेव व्यवहारांवर 'मर्चंट डिस्काउंट रेट' ( एमडीआर) व्यापारी वर्गाला लागू होतो, ग्राहकांना नाही. एमडीआर शुल्कामुळे बँका तसेच फिनटेक कंपन्यांना पायाभूत सुविधा आणि सुरक्षा यावर अधिक गुंतवणूक करण्यासाठी मिळेल मदत...*

संसदेमध्ये कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक 2026 ला मंजुरी देण्यात आली आहे. संसदेमध्ये वित्त मंत्री निर्मला सीतारमण यांनी स्पष्ट केले आहे की, या कायद्यामुळे यूपीआय देवघेवीवर कोणत्याही प्रकारे कर लागणार नाही. तसेच डिजिटल पद्धतीने देव-घेव व्यवहार करणा-या ग्राहकांना कोणतेही शुल्क लागणार नाही. यूपीआय संबंधित आर्थिक सुरक्षेसाठी जे आवश्यक होते, त्याप्रमाणे परिवर्तन केले आहे. तसेच यूपीआय वापरकर्त्यांच्या व्यवहारावर कोणत्याही प्रकारचा कर लागणार नाही. सरकारने असेही स्पष्ट केले आहे की, लहान व्यापारी मंडळींवर कोणताही 'एमडीआर' लावण्याचा हेतू सरकारचा नाही. कारण 'यूपीआय'च्या मदतीने सर्वांना बरोबर घेवून, वृद्धी घडवून आणण्याची आवश्यकता आहे.

## 'यूपीआय'शी संबंधित महत्वाची तथ्ये...

- वर्ष 2016-17 मध्ये प्रारंभ झाला. यूपीआय म्हणजेच एकीकृत भरणा पद्धत. ही भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेतील संपूर्ण जगामध्ये सर्वाधिक मोठी समावेशक आणि गतिशील व्यवहार प्रणालीपैकी एक आहे.
- यूपीआय जगातील सर्वाधिक वेगवान आर्थिक व्यवहार करणारी प्रणाली आहे. केवळ जुलै,2026 मध्ये यूपीआय मार्फत 29.9 लाख कोटी रूपयांचे; एकूण 2,366 कोटी देव-घेवीचे व्यवहार पार पाडले.
- यूपीआय आता 12 देशांबरोबर जोडले गेले आहे. या देशांमध्ये यूपीआयने व्यवहार केले जातात. सरकार आंतरराष्ट्रीय स्तरावर 'यूपीआय'ला सातत्याने प्रोत्साहन देत आहे.




## भारत सरकारने स्पष्ट घोषणा केली आहे की...

- **वापरकर्त्यांना शुल्क नाही:** पेमेंट करताना, त्या ग्राहकांना कोणत्याही व्यवहारांवर शुल्क द्यावे लागणार नाही.
- **पी 2 पी देवघेवीचा व्यवहार नि:शुल्क :** सर्व 'पर्सन टू पर्सन' देवघेवीचे व्यवहार नि:शुल्क असणार.
- **व्यापारी वर्गाला किरकोळ एमडीआर :** एमडीआर शुल्क लागू झाल्यानंतर, केवळ मर्यादित व्यापारी देव-घेवीवर, एका निश्चित मर्यादेपेक्षा जास्त व्यवहारावर, अगदी किरकोळ दराने शुल्क लागू होईल. हे एमडीआर शुल्क डेबिट अथवा क्रेडिट कार्डपेक्षाही खूपच कमी असेल.
- बहुतांश व्यापारी वर्गाला यूपीआय देव-घेव करणे नि:शुल्क असेल. लहान दुकानदार आणि किराणा दुकानांना यूपीआयव्दारे पेमेंट स्वीकारल्यानंतर एमडीआर द्यावा लागणार नाही.
- संसदेमध्ये कर आकारणी आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक 2026 मंजूर करण्यात आल्यानंतर, त्यामध्ये 'पेमेंट आणि सेटलमेंट प्रणाली अधिनियम, 2007 मधील कलम 10 ए मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. 'एनपीसीआय'च्या अध्यक्षतेखाली 'यूपीआय आणि सेवा संचालन समिती' एमडीआर ( लागू झाल्यास) याबाबत निर्णय घेईल.

# विकसित भारतासाठी अत्यावश्यक आहे शारीरिक आणि मानसिक सुदृढता

*विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी शारीरिकदृष्ट्या आरोग्यदायक, मानसिक स्वरूपाने सशक्त आणि आत्मविश्वासपूर्ण युवकांची पिढी असणे अनिवार्य आहे. याच दृष्टिकोणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन ऑगस्ट रोजी 'नशामुक्त युवक-विकसित भारत संकल्प अभियान' या उपक्रमाचा केला प्रारंभ...*

नशामुक्त भारत संकल्प अभियान, केवळ व्यक्तिगत आरोग्यापुरतेच मर्यादित नाही. तर संपूर्ण कुटुंब, समाज आणि संपूर्ण राष्ट्र यांच्या व्यापक हितांच्या पूर्तीसाठी आहे. याच कारणामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे अभियान म्हणजे एक महत्वपूर्ण संकल्प असल्याचे सांगितले आहे. त्याचबरोबर या राष्ट्रव्यापी अभियानामध्ये 28 हजारपेक्षा अधिक स्थानांवरून सहभागी झालेल्या एक कोटींपेक्षाही जास्त युवकांना त्यांनी मार्गदर्शन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले की, आज जर राष्ट्राने विकसित भारताचे लक्ष्य निश्चित केले आहे, तर मग ते साध्य करण्यासाठी काही गोष्टी अत्यावश्यक असणार आहेत. यामध्ये देशाचा युवक शारीरिक आणि मानसिक रूपाने सुदृढ असला पाहिजे.

युवक आत्मविश्वासाने परिपूर्ण असावेत, आणि अंमली पदार्थांसारख्या विनाशकारी सवयींपासून त्यांनी नेहमीच दूर राहिले पाहिजे. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, ''काशी घोषणा पत्रानुसार 125 पेक्षा अधिक आध्यात्मिक संघटना आणि इतर अनेक बिगर सरकारी संघटनांच्या समर्थनामुळे, कल्याणकारी विचार केला जात आहे. त्यातून एका राष्ट्रीय प्रकल्पाची निर्मिती यशस्वीपणे होत आहे.'' या अभियानातील महत्वाकांक्षी 100 आठवड्यांच्या पथदर्शी कार्यक्रमाची रूपरेषा सादर करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ''आगामी 100 रविवार पूर्णपणे नशा मुक्त भारताच्या दिशेने 100 दमदार पावले टाकल्याचे सिद्ध होईल. देशाचे भविष्य आणि जीवनासाठी, व्यसनमुक्त जीवन जगणे आवश्यक आहे.''

*"जर एखाद्या युवकाला चुकून नशा करण्याची सवय लागली आणि त्यामध्ये तो अडकला तर, त्याचा अर्थ असा अजिबात नाही की, त्याचे परतीचे सर्व मार्ग बंद झाले आहेत. घरातला कोणी मुलगा जर अंमली पदार्थांचा शिकार बनला असेल, तर ही गोष्ट सामाजिक प्रतिष्ठेला बाधक ठरते, म्हणून ती लपविण्यात येऊ नये. उलट त्या युवकाला नशा-मुक्त करण्यासाठी कोणाची मदत हवी असेल, तर त्याप्रमाणे सहकार्य घेतले पाहिजे. वैद्यकीय मदत घेवून आपल्या मुलाला नशेतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याबाबत आपण कुटुंबामध्ये मुलांबरोबर मोकळेपणाने संवाद साधण्याची संस्कृती तयार केली पाहिजे... त्यामुळे मुले नशेच्या गुंत्यामध्ये अडकण्यापूर्वीच आपण त्यांचा हात पकडू शकणार आहे.'*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



पंतप्रधान मोदी यांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करावा.

## पंतप्रधान मोदी यांनी सांगितलेल्या महत्वाच्या गोष्टी...

- अंमली पदार्थांनी मिळणारा क्षणिक आनंद अंततः करियर आणि कौटुंबिक जीवनाच्या पतनाचे कारण बनतो.
- कोणत्याही परिस्थितीमध्ये अंमली पदार्थांना सामाजिक स्वीकृती मिळता कामा नये.
- व्यसनावर नियंत्रण मिळविण्यासाठी सामाजिक सहयोग, योग, ध्यान आणि आधुनिक पुनर्वसन केंद्र महत्वाची ठरतात.
- संवेदनशील मुलांना अंमली पदार्थांच्या जाळ्यात ओढले जावू नये, यासाठी कुटुंबामध्ये मुक्त संवाद संस्कृतीला प्रोत्साहन द्यावे.
- शिक्षण तज्ज्ञांनी अंमली पदार्थांच्या धोक्यांवर चर्चेला नियमित अभ्यासक्रमात समाविष्ट करावे.
- अंमली पदार्थांच्या व्यसनातून बाहेर पडणारे युवक काही कमकुवत नाहीत, ते ख-या अर्थाने योध्दा आहेत.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंशी पंतप्रधान मोदी यांचा संवाद

# भावी पिढीसाठी प्रेरणादायी मंत्र... विजय

*स्कॉटलंडच्या ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2026 मध्ये भारताने नेत्रदीपक कामगिरी करत 13 सुवर्ण, 17 रौप्य आणि 9 कांस्य पदकांसह एकूण 39 पदके जिंकली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 10 ऑगस्ट रोजी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांशी संवाद साधला आणि देशासाठी अभिमानास्पद कामगिरी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी भारतीय क्रीडा क्षेत्रातील परिवर्तन, खेळाडूंची कामगिरी, तळागाळातील प्रतिभावंत खेळाडूंना घडवणे आणि देशभरात व्यापक क्रीडा संस्कृती विकसित करणे याबाबत सविस्तर चर्चा केली...*



## खेळाडूंच्या स्वागताची परंपरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात, त्यांच्या शासकीय निवासस्थानी राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करणाऱ्या खेळाडूंचे स्वागत करणे ही एक नियमित आणि जोपासलेली परंपरा राहिली आहे. खेळाडूंशी संवाद साधताना ते म्हणाले की, देशासाठी सातत्याने यश मिळवणाऱ्या भारतीय खेळाडूंचे समर्पित प्रयत्न आणि सातत्यपूर्ण यश शालेय विद्यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे प्रेरित करते.

## देशाच्या वीर सुपुत्रांना श्रद्धांजली

कारगिल विजय दिनी, पाकिस्तानी प्रतिस्पर्ध्यांना 5-0 असे हरवणाऱ्या भारतीय लष्करातील खेळाडूंच्या देशभक्तीचे पंतप्रधान मोदींनी कौतुक केले. खेळाडूंनी आपला विजय भारतीय सैन्यातील नायकांना समर्पित करताना सांगितले की अशा प्रकारचा अतुलनीय राष्ट्रीय गौरव क्रीडा स्पर्धेतील विजयाला अधिक चमकदार बनवतो. त्यांनी एका खेळाडूबरोबर सैन्याचे प्रशिक्षक नरेंद्र राणा आणि सामायिक नाव 'नरेंद्र' याबाबत एक विनोदी किस्सा ऐकवत हसतखेळत घालवलेले



## जेव्हा मीराबाई चानूच्या डोळ्यांमधून आनंदाश्रू तरळले

पोडियमवर उभे राहून राष्ट्रगीताची धून ऐकणे आणि डोळ्यांमधून आनंदाश्रू तरळणे. अनेक वर्षांची मेहनत, वेदना, दुखापती आणि त्यागासह सुवर्णपदक विजेत्या मीराबाई चानू यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील त्या भावूक क्षणाची कहाणी सांगितली, जेव्हा त्यांना आपले अश्रू आवरता आले नाहीत. पंतप्रधान मोदी त्यांना म्हणाले, "तुम्ही देशाची शान वाढवली आहे. तुमचे डोळे अश्रूंनी भरले होते; असे वाटत होते की, जणू त्यातील प्रत्येक थेंबामधून सुवर्णपदक तरळत आहे."



क्षण सामायिक केले. पंतप्रधान मोदी म्हणाले, "तुम्ही केवळ पदकांची संख्याच वाढवलेली नाही, तर एक संपूर्ण पिढी घडवली आहे."

### जे खेळतात, ते चमकतात

खेळाडूंशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, क्रीडा व्यवस्था हा एक पैलू आहे, मात्र देशाचा खेळाडू तेव्हाच पदक जिंकतो, जेव्हा देशात क्रीडा संस्कृती विकसित होते. मित्रांनो, तुम्ही अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देशाचे नाव अभिमानाने उंचावले आहे. मी तुमचे मनापासून अभिनंदन करतो. खात्री बाळगा, तुम्ही असेच यशस्वी व्हाल आणि पुन्हा एकदा इथे आपण भेटू.

### तू मोदींना भेटली आहेस का?

एका खेळाडूने संवादादरम्यान सांगितले की मित्रमंडळींमध्ये जेव्हा चर्चा व्हायची आणि मी म्हणायचे की हे तुझ्या चांगल्यासाठी आहे, तू कर. तेव्हा माझे मित्र म्हणायचे तू मोदींना भेटलीस आहेस का; तुझे आम्ही का ऐकू. ती खेळाडू म्हणाली आज मी तुम्हाला भेटले आहे, सर. आता मी त्यांना सांगू शकते की, हो, मी मोदीजींना भेटले आहे. ▪



*7, लोक कल्याण मार्ग येथे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2026 मधील आपल्या शानदार पदक विजेत्यांचे स्वागत करताना खूप आनंद झाला. स्पर्धेदरम्यान त्यांना आलेले अनुभव जाणून घेतले. या सर्वांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीने देशाचा सन्मान वाढवला आहे. त्यांचे यश अनेक युवकांना प्रेरित करेल.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या भारतीय खेळाडूंशी साधलेल्या संवादाचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

## पदकतालिका



सुवर्ण **13**



रौप्य **17**



कांस्य **9**

एकूण **39**

# भारतीय लोकशाही आणि समाजासाठी अमूल्य ठेवा

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे आत्मचरित्र




*जेव्हा हृदय उदार असते, व्यक्ती भारतीय संस्कारांशी घट्ट जोडलेले असते, तेव्हा ती समाजातील उणिवा काढण्यात वेळ वाया दवडत नाहीत तर सकारात्मक पैलूंवर लक्ष केंद्रित करते; आपल्या यशात समाजाला बरोबरीचा भागीदार मानते. असेच आहेत माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद. म्हणूनच त्यांच्या आत्मचरित्र प्रकाशन सोहळ्यात बोलताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की त्यांचे आत्मचरित्र भारतीय लोकशाही आणि समाजासाठी एक अमूल्य ठेवा आहे ...*

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये माजी राष्ट्रपती कोविंद यांच्या घराला एकदा आग लागली. त्यांच्या मातोश्री स्वतःची पर्वा न करता घरातील वस्तू वाचवत होत्या. त्याच प्रयत्नात आगीत अडकून त्यांचे निधन झाले. लहान वयात आईला अशा प्रकारे गमावणे, हे किती वेदनादायक ठरले असेल. या घटनेने कुणीही खचून गेले असते. मात्र त्या परिस्थितीने माजी राष्ट्रपतींना अधिक कणखर बनवले. शेजारी राहणाऱ्या एका मातेने त्यांच्या पालनपोषणात मदत केली. या घटनेतून त्यांना समाजातील एकता आणि सौहार्दाच्या शक्तीची जाणीव झाली. पुस्तक प्रकाशन प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याशी निगडित ही गोष्ट सांगितली. पंतप्रधान मोदी म्हणाले की माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा जीवन प्रवास तुम्ही त्यांच्याच शब्दांमधून जाणून घ्या. त्यांचे लेखन आणि त्यांचे अनुभव देशातील नव्या पिढीने वाचले, तर प्रत्येकाला त्यातून बरेच काही शिकायला मिळेल.

पंतप्रधान मोदी म्हणाले की या पुस्तकाला अतिशय समर्पक नाव दिले आहे—"Triumph of the Indian Republic: My Life, My Struggles". यातील भावना अशी आहे की, जीवन आणि जीवनातील संघर्ष हे त्यांचे वैयक्तिक आहेत; मात्र त्या संघर्षांतून मिळालेला विजय हा भारताच्या गणराज्याचा आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, "कोविंद जी यांच्याशी माझा खूप जुना परिचय आहे. त्यांना जवळून जाणून घेण्याची संधी मला मिळाली. राष्ट्रपती म्हणून त्यांचे मार्गदर्शन आणि त्यासोबतच माझ्याप्रती त्यांचा विशेष स्नेह व आत्मीयता ही माझ्यासाठी खूप मोठी संपत्ती राहिली आहे. त्यांचे जीवन जितके मी पाहिले आहे आणि त्यांच्या कार्यक्षमतेला जितके जाणून घेतले आहे, त्यावरून मी पूर्ण विश्वासाने सांगू शकतो की, रामनाथ कोविंद जी यांचे आत्मचरित्र हे भारतीय लोकशाही आणि भारतीय समाजासाठी एक अमूल्य ठेवा ठरेल."

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवा पिढीला आवाहन केले की आज रीलसचा जमाना आहे, सोशल मीडियावरील इन्फ्लुएन्सर्स आपल्याला खेचून कुठे-कुठे घेऊन जातात. या शॉर्टकटच्या युगातही आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. रेल्वे स्थानकांवर काही लोकांना रेल्वे रुळांवरून उडी मारून जाण्याची सवय असते, ते पुलाचा वापर करत नाहीत. तिथे लिहिलेले असते, शॉर्टकट विल कट यू शॉर्ट. आणि जर शॉर्टकटच्या मार्गानेही कुठे पुढे जायचे असेल, तर मी युवकांना सांगू इच्छितो की, तुम्हाला ज्याचे आवडते त्याचे आत्मचरित्र नक्की वाचा. आत्मचरित्र आपल्याला त्या कालखंडातील ऐतिहासिक घटनांना वेगळ्या दृष्टिकोनातून समजून घेण्याची संधी देते. ■

X



**PMO India**
@PMOIndia

"आज जेव्हा देशाने विकसित भारताचे लक्ष्य निश्चित केले आहे... त्यासाठी आवश्यक आहे... देशातील युवक तनामनाने निरोगी असावेत, त्यांच्यात आत्मविश्वास ठासून भरलेला असावा आणि अमली पदार्थांसारख्या घातक सवयींपासून नेहमी दूर राहावे".
PM @narendramodi



**Rajnath Singh**
@rajnathsingh

"भारत आता संरक्षण उपकरणांचा जगासाठी निर्माता आणि निर्यातदार बनत आहे. संरक्षण उत्पादन आणि निर्यातीत झालेली अभूतपूर्व वाढ, भारताची वाढती आत्मनिर्भरता, सामर्थ्य आणि जागतिक ओळख यांचा दाखला आहे."



**Amit Shah**
@AmitShah

"सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मजबूत करण्याच्या दिशेने आज अलवर येथे 200 कोटी रुपये खर्चून दररोज 3 लाख लिटर दुधाच्या प्रक्रिया क्षमतेच्या अलवर सरस डेअरीच्या नवीन संयंत्राचा ई-शिलान्यास केला. तसेच 274 कोटी रुपये खर्चासह सरस डेअरीशी संबंधित चार अन्य प्रकल्पांचे ई-लोकार्पण देखील करण्यात आले.
आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा या संयंत्रांमधून उत्पादन प्रक्रिया अधिक वैज्ञानिक, पारदर्शक आणि कमी ऊर्जेचा वापर असलेली बनेल. यामुळे या परिसरातील दूध उत्पादकांना त्यांच्या दुधासाठी रास्त भाव मिळेल, ग्रामीण भागांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, आणि प्रदेशात 'सहकारातून समृद्धी' या संकल्पाला अधिक बळ मिळेल."



**Nitin Gadkari**
@nitin_gadkari

"सीआरआयएफ अंतर्गत, उत्तराखंडमध्ये एकूण 235.42 किलोमीटर लांबीच्या 9 रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या आणि मजबुतीकरणाच्या कामांसाठी 297.37 कोटी रुपये खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे."
#PragatiKaHighway #GatiShakti



**Shivraj Singh Chouhan**
@ChouhanShivraj

"आज लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून मी देशासमोर असलेल्या शक्तीच्या सप्तधारेचे आवाहन करतो.
1. उत्पादन शक्ती
2. कृषी आणि अन्न प्रक्रिया
3. तंत्रज्ञान आणि नवोन्मेष
4. गतिशक्ती
5. संरक्षण सामर्थ्य
6. हरित आणि नील अर्थव्यवस्था
7. भारताची प्रभावी क्षमता
आदरणीय पंतप्रधान @narendramodi जी



**Arjun Ram Meghwal**
@arjunrammeghwal

देशातील युवकांसाठी मोठी घोषणा
- पुढील एका वर्षात 1 कोटी युवकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे कौशल्य प्रशिक्षण
- युवकांच्या उज्वल भविष्यासाठी विविध परीक्षांचे मोफत ऑनलाइन प्रशिक्षण
#IndiaIndependenceDay



## लाल किले की प्राचीर से मोदी ने युवाओं से नेतृत्व संभालने का आह्वान किया

## हथियारी नक्सली गए, दिमागी मौके की तलाश में: PM

## मोदी ने बताई 'सप्त धारा' जिनसे बनेगा विकसित भारत

'वंदे मातरम्' का भी जिक्र



लाल किले से पीएम ने कहा कि विकसित भारत बनाने के लिए नई सोच की जरूरत है।

1 मैन्युफैक्चरिंग
2 कृषि-खाद्य उत्पादन और खाद्य प्रसंस्करण
3 टेक्नॉलजी और इनोवेशन
4 गति शक्ति
5 रक्षा शक्ति
6 ग्रीन और ब्लू इकॉनमी
7 सॉफ्ट पावर

### सप्त सिंधु... सात नदियों की धरती, भारत की है यह प्राचीन पहचान



कौन सी सप्त सिंधु की 7 नदियां?

## बड़े सुधारों की ओर भारत, पुराने नियमों से काम नहीं चलेगा : पीएम

- जल्द ही बड़े आर्थिक सुधारों के संकेत, कहा- बढ़ानी होगी रिफार्म की गति
- मोदी ने कहा- दुनिया की टाप कंपनियों से लेकर बैंक तक में भारत की हिस्सेदारी बढ़ाएं

जागरण ब्यूरो, नई दिल्ली: स्वतंत्रता दिवस पर अपने संबोधन में प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने जल्द ही बड़े आर्थिक सुधारों के संकेत दिए। उन्होंने स्पष्ट कहा कि विकसित भारत के सपनों को पूरा करने के लिए बीते समय की नीतियों व नियमों से काम नहीं चलेगा। बड़े रिफार्म के साथ रिफार्म की गति भी बढ़ानी होगी और इस काम में राज्य सरकार को भी सहयोग करना होगा। राज्य सरकार, इंडस्ट्री और देशवासियों की बदौलत ही दुनिया की 500 बड़ी कंपनियों में भारत की 50 कंपनियां शामिल हो सकती हैं।

पीएम ने कहा, विश्व के पांच टाप बैंक में भारत का भी बैंक होना चाहिए। फार्मा के क्षेत्र में भारत ने बहुत काम किया है और कम से कम एक-दो भारतीय फार्मा कंपनियों का नाम वैश्विक स्तर पर गूंजना चाहिए। वैश्विक ला फर्म, एकाउंटिंग फर्म व रेटिंग एजेंसियों में भी भारत का नाम टाप पर होना चाहिए।

अभी फार्चुन 500 कंपनियों में भारत की 10 कंपनियां हैं। इनमें रिलायंस इंडस्ट्रीज, एलआइसी, ओएनजीसी, एसबीआइ, एचडीएफसी, इंडियन आयल, टाटा मोटर्स शामिल हैं, लेकिन दुनिया के 10 शीर्ष बैंक में एक भी बैंक भारत का नहीं है। वित्त मंत्रालय का मानना है कि एसबीआइ और एचडीएफसी बैंक में टाप बैंकों में शामिल होने की क्षमता है। इसी तरह भारत दुनिया का 20 प्रतिशत जेनेरिक दवा का उत्पादन करता है, लेकिन सन फार्मा को छोड़ किसी भी कंपनी की वैश्विक पहचान नहीं है। विशेषज्ञों का कहना है कि पीएम ने कंपनियों से वैश्विक बनने के लिए कहा है।

प्रधानमंत्री ने कहा, हमारे ब्रांड हमारे देश की पहचान हों। ऐसा तभी संभव है जब हम ऐसे उत्पाद का निर्माण करने लगेंगे जिसकी जरूरत पूरी दुनिया को हो। यह सब बड़े अनुसंधान, बड़े जोखिम से ही संभव हो सकेगा। पीएम ने युवाओं से कहा कि अनुसंधान के लिए इस बार के बजट में एक लाख करोड़ रुपए का प्रविधान रखा गया है।

### देश में चिप निर्माण से जुड़े तीन प्लांट शुरू किए गए

प्रधानमंत्री ने बताया कि देश में चिप निर्माण से जुड़े तीन प्लांट शुरू हो गए हैं। कुछ सालों में आठ और प्लांट उत्पादन करने लगेंगे। किसी भी इलेक्ट्रानिक्स सामान के साथ मेडिकल उपकरण या आटोमोबाइल्स के लिए चिप जरूरी है। भारत में चिप निर्माण से जुड़ी कंपनियों में माइक्रोन टेक्नोलाजी, टाटा इलेक्ट्रानिक्स, सीजी पावर, केंस सेमीकान, एचसीएल-फाक्सकान प्रमुख हैं। अगले दो-तीन साल में भारत चिप का बड़ा निर्यातक होगा।

## बंटवारे का दंश...कई जिंदगियां तहस-नहस हो गईं : पीएम मोदी

विभाजन विभीषिका स्मृति दिवस : शून्य से जिंदगी शुरू करने वालों ने देश को आगे बढ़ाया



## पेपर लीक रोकने से लेकर परीक्षाओं में व्यापक सुधार करने के लिए कदम उठा रही सरकार : राष्ट्रपति



# “सारनाथचे प्राचीन बौद्धस्थळ”
## आता युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट

*दक्षिण कोरियातील बुसान येथे आयोजित 'जागतिक वारसा समिती'च्या 48 व्या बैठकीत, 2025-26 या वर्षासाठी भारतातील सारनाथ येथील प्राचीन बौद्ध स्थळाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. जागतिक वारसा यादीत समावेश झालेले हे भारतातील 45 वे ठिकाण ठरले आहे. हा जागतिक सन्मान, भारताचा चिरंतन सांस्कृतिक वारसा, वास्तुशिल्पातील नैपुण्य, प्रादेशिक ओळख आणि ऐतिहासिक सातत्य यांसारख्या विविध परंपरा अधोरेखित करतो...*

- वारसास्थळांच्या यादीत 45 स्थळांच्या समावेशासह, भारत जागतिक स्तरावर सहाव्या आणि आशिया-प्रशांत क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे, जिथे सर्वाधिक 'जागतिक वारसा स्थळे' आहेत.

“

*प्रत्येक भारतीयासाठी हा अभिमानाचा क्षण आहे! उत्तर प्रदेशातील सारनाथचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्यामुळे मला अतिशय आनंद आहे. सारनाथचा भगवान बुद्धांशी अतिशय जवळचा संबंध असून, त्यांचा ज्ञान, करुणा आणि सामंजस्याचा कालातीत संदेश संपूर्ण जगाला प्रेरणा देतो. हा सन्मान भारताच्या समृद्ध संस्कृतीचा आणि आध्यात्मिक वारशाचा गौरव करणारा आहे. तसेच, यामुळे जगभरातील अधिकाधिक लोकांना सारनाथला भेट देण्याची आणि भगवान बुद्धांच्या आदर्शांशी जोडले जाण्याची प्रेरणा मिळेल.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




न्यू इंडिया **समाचार** पाक्षिक

आर.एन. आय, DELHIN/2020/78812, 1-15 सप्टेंबर, 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक- 20 अगस्त 2026, एकूण पृष्ठ-46)

मुख्य संपादक
धीरेन्द्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद
महासंचालक, केंद्रीय संचार ब्यूरो

खोली क्रमांक-278, केंद्रीय संचार ब्यूरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली -110003 हून प्रकाशित